



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ५३ * नांदेड * बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# अजितदादा विमान अपघात प्रकरणी कारवाई, 'डीजीसीए'ची व्हीएसआरच्या विमान उड्डाणावर बंदी



**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघातानंतर डीजीसीएने व्हीएसआर कंपनीवर मोठी कारवाई केली आहे. व्हीएसआरच्या लेअरजेट विमानांच्या उड्डाणास बंदी घालण्यात आली आहे. कंपनीच्या विमानांमध्ये तांत्रिक त्रुटी असल्याचं सांगून नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने त्यांच्या लेअरजेट विमानांच्या उड्डाणास बंदी घातली आहे.

अजित पवार यांचे बारामतीत विमान दुर्घटनेत निधन झाल्यानंतर संबंधित विमान कंपनी व्हीएसआरवर कारवाई करण्यात यावी, त्या कंपनीच्या विमान उड्डाणांवर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी सातत्याने केली जात होती. त्या मागणीला आता यश आले आहे. विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात डीजीसीएने व्हीएसआर या हवाई वाहतूक कंपनीवर मोठी कारवाई केली आहे. व्हीएसआरच्या विमान उड्डाणांवर बंदी घातली आहे. अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी डीजीसीएने हे कठोर कारवाईचे पाऊल उचलले आहे. व्हीएसआर कंपनीने अनेक नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादीचे इतर आमदार यांच्याकडून सातत्याने व्हीएसआर कंपनीवर आरोप केले जात होते. आता त्याप्रकरणी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने एक एक प्रेस नोट काढून व्हीएसआरवर कारवाई करण्यात आल्याचं सांगितलं. या कंपनीच्या चार विमानाच्या उड्डाणावर बंदी घालण्यात आली आहे. आर एटीव्हीआर एस आणि विटीव्हीआरए आणि विटीआर स्टील द म्हणजे हे कंटिन्यू या विमानांच्या उड्डाणांना बंदी घालण्यात आली आहे. विमान वाहतूक संचालनालयाचा हा अत्यंत मोठा निर्णय आहे, लेजेट ४०, ४५ आर एस टीआरआय या विमानांच्या उडानावरही बंदी घालण्यात आली.

## बारामती विमान दुर्घटनेनंतर आणखी एक अपघात; रांचीतील एअर ॲम्ब्युलन्स क्रॅशमध्ये ७ जणांचा मृत्यू

**रांची –** झारखंड येथील चतरा येथे सोमवारी संध्याकाळी एअर ॲम्ब्युलन्स दुर्घटनेत डॉक्टर, रुग्णासह सर्व ७ जणांचा मृत्यू झाला आहे. या एअर ॲम्ब्युलन्समधून रांचीहून रुग्णाला दिल्ली नेण्यात येत होते. तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाल्याचे बोलले जाते. विमान वाहतूक नियामक डीजीसीएने विमान अपघात तपास ब्युरोला रांचीतील अपघाताची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**३० दिवसांत दुसरा अपघात**

एका महिन्यात २ चार्टर्ड प्लेन अपघातामुळे विमान वाहतुकीच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. २८ जानेवारीला पुण्यातील बारामती येथे अजित पवार यांचे विमान दुर्घटनाग्रस्त झाले होते. त्यात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर २३ फेब्रुवारीला सोमवारी रांची येथे ही भीषण दुर्घटना घडली. रांचीच्या देवकमल हॉस्पिटलचे सीईओ अनंत सिन्हा म्हणाले की, रुग्णाच्या कुटुंबाने आधुनिक उपचारासाठी रुग्णाला दिल्लीला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. एअर ॲम्ब्युलन्सने रांची विमानतळावरून संध्याकाळी ७.१० वाजता त्यांनी उड्डाण घेतले. त्यानंतर ७.३४ वाजता विमानाचा संपर्क तुटला. या विमानाचा शेवटचा संपर्क कोलकाता एअर कंट्रोलशी झाला होता. विमानाचा रडार संपर्क वाराणसीच्या दक्षिण पूर्वेकडील १०० एनएम अंतरावर तुटला होता. वाराणसी एअर ट्रॅफिक कंट्रोलनुसार या विमानाने त्यांच्याशी संपर्क केला नव्हता.

# सरकारकडून अर्थसंकल्पीय अधिवेशनात ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर, काँग्रेसकडून टीकास्त्र

**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी म्हणजेच कालपासून सुरु झालं आहे. मंगळवारी राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. तर, राज्य सरकारच्या या निर्णयावर काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी टीका केली आहे. सचिन सावंत यांनी अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी अशी विधिमंडळाच्या अधिवेशनानं नावे देण्याऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे, असा सल्ला देखील महायुती सरकारला दिला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च – ५,७४८ कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च ६००३ कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**ऊर्जा आणि उद्योग क्षेत्र:** ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी ४,०६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक ३२६२ कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर ८०३ कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी १४३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी ७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**नियोजन विभाग:** ८० कोटी रुपये. अन्न व नागरी पुरवठा विभाग : ५५.५२ कोटी रुपये. ओबीसी **कल्याण विभाग :** २३.६४ कोटी **रुपये महसूल आणि वन विभाग** : १३२ कोटी रुपये वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग : ३१ कोटी रुपये.

राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्यानं विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी पोस्ट करत राज्य सरकारला काही सवाल विचारले आहेत. सचिन सावंत म्हणाले, अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी अशी विधिमंडळाच्या अधिवेशनांना नावे देण्याऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे. उगीचच अर्थसंकल्पीय अधिवेशन वगैरे शब्द वापरून जनतेची दिशाभूल का करावी?, असा सवाल सचिन सावंत यांनी केला.

अर्थसंकल्प या शब्दातून महायुती सरकारच्या काळात प्रत्येक अधिवेशनात जर पुरवणी मागण्या त्याही हजारो कोटींच्या येत असतील तर नियोजन ते काय? आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही त्या आणल्या जात असतील तर या संकल्पाला अर्थ काय? हा प्रश्न विचारला पाहिजे, असं सचिन सावंत यांनी म्हटलं.

## भाजपकडून नव्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक

# नांदेडमधून संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख प्रदेश उपाध्यक्षपदी

### ■ नांदेडचे नवनाथ बन पक्षाचे मुख्य प्रवक्ते



**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची फेररचना केली असून नव्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यात नांदेडमधून मराठवाडा संघटन मंत्रीपदी कार्यरत संजय कौडगे आणि चैतन्य बापू देशमुख यांची प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लागली आहे. याचबरोबर मूळचे नांदेडचे असणारे आणि नुकत्याच झालेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत नगरसेवक म्हणून विजयी झालेले नवनाथ बन यांच्यावर पक्षाच्या मुख्य प्रवक्ते पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मराठवाड्यातून लातूरच्या डॉक्टर अर्चना पाटील चाकूरकर यांचीही प्रदेश उपाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली आहे.

**१२ जणांची उपाध्यक्षपदी निवड:** भाजपने एकूण १२ जणांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. यात अतुल काळसेकर, डॉ. भारती पवार, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील अशा १२ जणांच्या नावावर उपाध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

**६ सरचिटणीसांची घोषणा:** तर दुसरीकडे संघटनात्मक कामात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी ६ सरचिटणीसांची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी आमदार निरंजन डावखरे, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे आणि योगेश सागर यांची सरचिटणीस म्हणून वर्णी लागली आहे. तर मंगेश चव्हाण, संजय कुटे, परिणय फुके, वर्षा डहाळे, संजय जगताप, अर्चना डेहणकर, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी आणि भैरवी घाक यांना चिटणीस पदावर संधी देण्यात आली आहे.

**विविध आघाड्यांचे प्रमुख:** युवा मोर्चा: कोल्हापूरचे कृष्णराज महाडिक यांची युवा मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे.

**महिला मोर्चा:** चित्रा वाघ यांच्याकडे महिला मोर्चाची धुरा कायम ठेवण्यात आली आहे.

**ओबीसी मोर्चा:** योगेश टिळेकर यांची ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदी घोषणा करण्यात आली आहे. कोषाध्यक्ष: मुंबईचे आमदार मिहीर कोटेचा यांच्याकडे पक्षाच्या तिजोरीची किल्ली सोपवण्यात आली आहे.

**मुख्य प्रवक्ते:** केशव उपाध्ये यांच्यानंतर आता नवनाथ बन हे पक्षाचे मुख्य प्रवक्ते म्हणून काम पाहतील.

# मराठा आरक्षणात दिरंगाई! सहा महिन्यानंतरही हैदराबाद गॅझेटियरची कार्यपद्धती निश्चित नाही, सरकारकडून नवीन समिती

**मुंबई (प्रतिनिधी) –** मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही या संदर्भातील स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळेच कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी येत आहेत, अशी कबुली सरकारने २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशातून दिली आहे.

सरकारने मान्य केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे अर्ज कमी प्रमाणात दाखल होत आहेत. तसेच प्रमाणपत्रांचे वाटपही अत्यल्प झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता नवी समिती स्थापन करण्यात आली असून, ही समिती आवश्यक कार्यपद्धती तयार करणार आहे.




छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. संबंधित समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर कार्यपद्धती ठरवणार आहे.

कार्यपद्धती तयार झाल्यानंतर ती राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. मंजुरीनंतरच प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला गती मिळेल, अशी माहिती अधिकृत आदेशातून समोर आली आहे.

सरकारने आंदोलनानंतर तत्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सहा महिन्यांनंतरही कार्यपद्धती निश्चित न झाल्याने प्रशासनाच्या दिरंगाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ही उदासीनता नाही तर आणखी काय? असा सवाल आता राजकीय व सामाजिक वर्तुळातून उपस्थित होत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या दिरंगाईबाबत खुलासा करावा, अशी मागणी देखील होत आहे. दरम्यान, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली असून, समितीमार्फत कार्यपद्धती लवकरात लवकर निश्चित केली जाईल, असे संकेत दिले आहेत.

## केरळचे नाव बदलून केरळम होणार?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** केरळचे नाव बदलून केरळम करण्याचे विधेयक आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर होण्याची शक्यता आहे. केरळ राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वीचा हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. राज्य विधानसभेने अधिकृत नोंदींमध्ये हे नाव बदलण्याचा ठराव आधीच मंजूर केला आहे. केरळमध्ये मे महिन्यापूर्वी राज्य विधानसभेचे १४० सदस्य निवडण्यासाठी निवडणुका होण्याची अपेक्षा आहे. भारतीय निवडणूक आयोगाने अद्याप कोणतीही अधिकृत तारीख जाहीर केलेली नाही.




दरम्यान, २०२४ मध्ये हा ठराव मांडणारे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांची इच्छा होती की केंद्र सरकारने देशाच्या संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व भाषांमध्ये दक्षिणेकडील राज्याचे नाव केरळवरून केरळम करावे. दरम्यान, २५ जून २०२४ रोजी, विधानसभेने दुसऱ्यांदा हा ठराव मंजूर केला. कारण पहिल्या ठरावाचा आढावा घेणाऱ्या केंद्रीय गृह मंत्रालयाने काही तांत्रिक बदल सुचवले होते.

## भारत-अर्जेंटिना संसदीय मैत्री गटाच्या अध्यक्षपदी खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत - अर्जेंटिना संसदीय मैत्री गटाच्या अध्यक्षपदी राज्यसभेचे खा. अशोकराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ही नियुक्ती जाहीर केली.



भारत आणि अर्जेंटिना यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणे, संसदीय पातळीवर संवाद वाढविणे तसेच परस्पर सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करणे, हा या संसदीय मैत्री गटाचा प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून दोन्ही देशांतील लोकप्रतिनिधींमध्ये संवाद, विचारांची देवाणघेवाण आणि विविध क्षेत्रांतील सहकार्याला चालना मिळणार आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांनी या नियुक्तीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचे आभार मानले असून, या नियुक्तीमुळे भारत-अर्जेंटिना संबंधांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शाळेसमोर थांबलेल्या महिलेचे सव्वा लाखाचे गंठण लंपास


**नांदेड (प्रतिनिधी) –** शहराच्या राज कॉर्नर परिसरात असलेल्या एका शाळेच्या प्रवेशद्वारासमोर थांबलेल्या महिलेच्या गळ्यातील सव्वा लाख रुपयांचे गंठण दोन चोरट्यांनीजबरीने चोरून पळ काढला. ही घटना २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली.

माणिकनगर तरोडा बुद्रुक येथील विद्या बाळासाहेब भोपळे (वय ४०) ह्या २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास याच भागात असलेल्या शिवाजी माध्यमिक शाळेच्या गेटजवळ उभ्या होत्या. यावेळी राज कॉर्नरकडून विनानंबर असलेल्या एका दुचाकीवरून दोन चोरटे त्यांच्याजवळ आले आणि पाहता पाहता त्यांच्या गळ्यातील सव्वा लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण तोडून नेले. विद्या भोपळे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वाडेवाले करत आहेत.

**हदगाव शहरामध्ये दोन लाखाची घरफोडी**

हदगाव शहराच्या श्रीकृष्णनगर भागात शिवदास प्रल्हाद कुबडे (वय ४२) या व्यापाऱ्याचे १४ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून घरातील कपाटात ठेवलेले सोन्या- चांदीचे दागिने असा दोन लाख तीन हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. बाहेर गावाहून १७ फेब्रुवारी रोजी आल्यानंतर शिवदास कुबडे यांच्या चोरीची घटना लक्षात आली. त्यांनी लगेच हदगाव पोलीस ठाणे गाठले आणि घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून शिवदास कुबडे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# नांदेड शहरातील मुख्य रस्त्यावरील 'एटीएम' मशीन चोरट्यांनी पळविली

### ७ लाखांची रोकड असल्याचा अंदाज; सहा पोलीस पथके रवाना

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील तरोडा बुद्रुक भागात असलेल्या नागेश कॉम्प्लेक्समधील एसबीआय बँकेचे एटीएमच अज्ञात ३ ते ४ चोरट्यांनी पिकअप वाहनाद्वारे पळवून नेले. ही घटना २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजता घडली. या एटीएममध्ये ६ लाख ७३ हजार रुपयांची रोख असल्याचा अंदाज आहे. या चोरीमुळे शहरात खळबळ उडाली असून चोरट्यांच्या शोधासाठी सहा पोलीस पथके विविध भागांत रवाना करण्यात आली आहेत. घटनास्थळाला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय आणि भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी भेट देऊन पाहणी केली.



तरोडा बुद्रुक भागातील संकेत हॉस्टेलजवळ एसबीआय बँकेचे एटीएम केंद्र आहे. नेहमीच वर्दळ असलेल्या भागात दि. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजता अज्ञात ३ ते ४ चोरट्यांनी सदर एटीएम उचलून थेट पिकअप वाहनात टाकले आणि तेथून पोबारा केला. या एटीएममध्ये ६ लाख ७३ हजार ५०० रुपयांची रोख असल्याचे बँकेच्या अधिकाऱ्याने सांगितले.

पोलिसांनी या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता अज्ञात चोरटे हे एटीएम मशीन पिकअप वाहनाद्वारे मालेगावच्या दिशेने नेतांना दिसून येत आहेत. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांची सहा पथके एटीएम चोरणाऱ्यांच्या शोधासाठी रवाना झाल्याचे पीआय तांबे यांनी सांगितले आहे. दरम्यान, याच भागातील एटीएम यापूर्वीही फोडण्याचे प्रकार घडले आहेत. आता तर चोरट्यांनी चक्क एटीएम मशीनच पळविल्यामुळे या भागात खळबळ उडाली आहे. तर चोरट्यांनी चक्क एटीएम मशीन चोरून नेले आहे. याप्रकरणी अद्याप बँकेकडून तक्रार देण्यात आली नसल्याचेही तांबे यांनी सांगितले.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# कृत्रिम बुद्धिमत्ता: उपयोगिता आणि धोके

दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेली 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट' ही परिषद या बदलत्या युगाची नांदी ठरावी अशी अपेक्षा आहे. विकसनशील देशात इतक्या व्यापक प्रमाणावर भरवली जाणारी ही पहिलीच परिषद असल्याने भारताच्या क्षमतेचे आणि आत्मविश्वासाचे दर्शन जगाला घडत आहे. एकीकडे जागतिक तंत्रज्ञान कंपन्या, संशोधन संस्था, विद्यापीठे आणि स्टार्टअप्स यांची उपस्थिती, तर दुसरीकडे थेट प्रात्यक्षिके आणि 'एआय एक्स्पो'च्या माध्यमातून सादर होणारे नवोन्मेष, या सर्वांनी एक तंत्रस्नेही वातावरण तयार झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय क्षेत्रात आघाडीवर असल्याचे नमूद करताना मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा, चैतन्यशील स्टार्टअप परिसंस्था आणि संशोधन क्षमतेचा उल्लेख केला. यात तथ्य नक्कीच आहे. आधार, यूपीआय, डिजिलॉकरसारख्या डिजिटल उपक्रमांमुळे भारताने मोठी झेप घेतली आहे. परंतु नेतृत्त्वाचा दावा करताना जबाबदारीची जाणीव तितकीच आवश्यक आहे. एआयचे व्यवस्थापन, त्यासाठीचा जागतिक आराखडा आणि सहकार्याची रूपरेषा याबाबत स्पष्टता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे केवळ विज्ञानकथांमधील कल्पनारंजन राहिलेले नाही; ती आजच्या वास्तवाचा आणि उद्याच्या भविष्याचा कणा बनत आहे. माणसाच्या बुद्धीने निर्माण केलेली ही 'बुद्धिमान' यंत्रणा आता सर्जनशील लेखनापासून आरोग्यसेवेपर्यंत, शेतीपासून उद्योगधंद्यांपर्यंत आणि प्रशासनापासून संरक्षणापर्यंत सर्वच क्षेत्रांत निर्णायक हस्तक्षेप करू लागली आहे. अशा या ऐतिहासिक वळणावर भारत उभा आहे तो संधी आणि जबाबदारी यांच्या समतोल साधण्याच्या कसोटीवर. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुहेरी तलवार आहे, असे वारंवार म्हटले जाते. एका बाजूला ती उत्पादकता वाढवते, निर्णयप्रक्रिया वेगवान करते, नव्या संशोधनाला चालना देते; तर दुसऱ्या बाजूला रोजगारावर परिणाम, गोपनीयतेचा प्रश्न, बालसुरक्षा, दिशाभूल करणारी माहिती आणि नैतिकतेचे प्रश्न निर्माण करते. विशेषतः मुलांच्या मानसिक आरोग्यावर, शिक्षणपद्धतीवर आणि सामाजिक वर्तनावर एआय साधनांचा काय परिणाम होतो, याविषयी अजून ठोस संशोधनाची गरज आहे. तंत्रज्ञानाचा अंधानुकरणी स्वीकार न करता, पुराव्यावर आधारित धोरणे आखणे अधिक सयुक्तिक ठरेल. सरकारने एआय क्षेत्रात अतिनियमन टाळण्याचे धोरण स्वीकारले आहे. कल्पकतेला वाव देण्यासाठी हे आवश्यक असले, तरी 'नियमन नसणे' आणि 'सुयोग्य नियमन' यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. जीपीयू सारखी संगणकीय साधने किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्याची तयारी ही स्वागतार्ह बाब आहे. संशोधन आणि स्टार्टअप्ससाठी आवश्यक असलेली संगणकीय क्षमता स्वस्तात मिळाल्यास नवकल्पनांना गती मिळेल. मात्र, या संधीचा लाभ काही मोजक्याच कंपन्यांपुरता मर्यादित राहू नये, याचीही दक्षता घ्यावी लागेल. भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. नागेश्वरन यांनी खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि धोरणकर्त्यांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज अधोरेखित केली आहे. हे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण आहे. भारतात रोजगारक्षम तरुणांची संख्या मोठी असली, तरी कौशल्यांतील दरी गंभीर आहे. एआयचा विकास 'आपोआप' होईल, अशी अपेक्षा ठेवण्यापेक्षा तो व्यापक कौशल्यविकासाशी आणि रोजगारनिर्मितीशी जोडणे गरजेचे आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमात डेटा साक्षरता, संगणकीय विचारप्रणाली, नैतिक तंत्रज्ञान आदी घटकांचा समावेश करणे ही तातडीची गरज आहे. एआयमुळे पारंपरिक कौशल्ये कालबाह्य ठरतील, अशी भीती अनेकदा व्यक्त होते. काही नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार हे वास्तव आहे. परंतु प्रत्येक तांत्रिक क्रांतीने जुन्या नोकऱ्यांसोबत नव्या संधीही निर्माण केल्या आहेत, हे इतिहास सांगतो. मुद्रणयंत्र, औद्योगिक क्रांती किंवा इंटरनेट यांची सुरुवातीला प्रत्येकाने धास्ती निर्माण केली; परंतु योग्य प्रशिक्षण आणि धोरणांमुळे समाजाने त्या बदलांना स्वीकारले. एआयच्या बाबतीतही हेच तत्त्व लागू पडते. प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही, तर त्याच्या वापराचा आहे. म्हणून काळाच्या प्रवाहात आपण स्वतःलाही बदलले पाहिजे. परंतु यामध्ये एक महत्त्वाचा पैलू आहे, तो म्हणजे नैतिकता आणि उत्तरदायित्व. एआय प्रणाली निर्णय घेत असताना त्यामागील अल्गोरिदम अर्थात माहिती संकलन व त्यावरील प्रक्रिया ही पारदर्शक असणे, पूर्वग्रह टाळणे आणि चुकीच्या निर्णयांसाठी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा तंत्रज्ञानाच्या नावाखाली अन्याय वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय सहकार्य, डेटा सुरक्षेचे मानदंड आणि मानवकेंद्री दृष्टीकोन यांचा समन्वय साधणे भारतासाठी मोठे आव्हान असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारतासाठी धोका नसून मोठी संधी आहे, पण ती संधी आपोआप फळाला येणार नाही. स्पष्ट आणि दूरदर्शी धोरणे, सर्वसमावेशक कौशल्यविकास, सुयोग्य नियमन आणि नैतिक चौकट या चार स्तंभांवरच एआयचे भवितव्य उभे राहील. भारताला जर या क्षेत्रात नेतृत्व करायचे असेल, तर केवळ घोषणांनी नव्हे तर ठोस कृतीने आणि सामाजिक बांधिलकीने ते सिद्ध करावे लागेल. एआय माणसावर राज्य करेल की माणूस एआयचा सुजाण वापर करेल, याचा निर्णय आजच्या धोरणांवर अवलंबून आहे. याचा वापर करण्यापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगिता आणि त्यातील धोके हे ओळखले पाहिजेत.

# संस्कारित व सशक्त युवाशक्ती राष्ट्राची खरी संपत्ती



मानवी शरीर निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार आहे. आपल्या जीवन प्रवासात शरीर आणि आपली इंद्रिये ही अत्यंत महत्वाची संपत्ती आहे. ज्या संपत्तीचे मूल्य कधीही पैशात मोजता येणार नाही. सर्व प्रगतीचा तो आरंभबिंदू आहे. या संपत्तीशिवाय होणारी प्रगती मनुष्याला निखळ सुखापर्यंत नेऊ शकत नाही. मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय हे निखळ आणि निरागस आनंदात दडलेले आहे.त्यामुळे सशक्त शरीर असेल तर अनेक दुःखावर मात करून सुखाच्या मार्गाकडे वाटचाल करणे. आपल्या ध्येयाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी अतोनात कष्ट उपसण्याची तयारी ठेवणे शक्य आहे. केवळ इच्छाशक्ती आहे, पण शरीर साथ देत नाही त्या व्यक्तीला त्याच्या आंतरिक इच्छेला लगाम घालावा लागतो.

शरीर संपत्ती मिळविण्यात अपयशी ठरलेले युवक उसळते साहस घेऊन जगण्याच्या ऐन उमेदीत आपल्या आजारांचे कौतुक करीत फिरताना दिसतात. कोणत्याही कार्यकर्तृत्वाचा आनंद घेण्यासाठी असमर्थ ठरलेल्या युवकांना आपले जीवन भकास वाटू लागते. त्यामुळे शरीर ही संपत्ती आहे, ते एक नादमधुर संगीत आहे, तो जीवनातील सर्वोच्च आनंद आहे, नव्हे तो स्वर्ग आहे. शरीराची महती स्पष्ट करताना खूप ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांनी हे अनेकदा आपल्यासारख्या पामरांना सांगितले आहे.पण जेव्हा तरुणाईचे उसळते साहस रोमारोमांत संचार करते. तेंव्हा या शरीरधनाची जोपासना करणे, त्यामधून दीर्घायुरोग्य प्राप्त करुन घेणे आणि जीवनप्रवासातील दीर्घायुष्याचा परमोच्च आनंद घेणे या गोष्टीचा आम्हाला विसर पडतो. हे अगदी सहजसाध्य झाले आहे. यासाठी कोणतेही कष्ट घ्यावे लागले नाही. त्यामुळे जीवनातील व्यसनाधीनता, अविचार, वाममार्ग याचे आम्ही एवढ्या सहजपणे समर्थन करतो. त्या समर्थनामुळे भावी जीवनात निर्माण होणाऱ्या संकटाची तमा बाळगण्याची गरज युवकांना वाटली पाहिजे. उसळत्या साहसात विचारी बीजे रुजलेली असतील तर ती शक्ती सकारात्मक कार्याच्या दिशेने वाटचाल करेल. दिशाहीन उसळते साहस वाममार्गाच्या दिशेने वाटचाल करीत असेल तर ते शरीरधन युवाशक्तीच्या नाशाला कारणीभूत ठरते. युवाशक्तीकडे अत्यंत आशेने पाहणाऱ्या पालकांचा आधार जो युवक होऊ शकत नाही. ते शरीरधन काय उपयोगाचे? आपल्या शक्ती दिशाहीन होणार नाही हा विचार घेऊनच युवकांची दिनचर्या असली पाहिजे.

मानवी शरीर निसर्गाची अनमोल देणगी आहे. त्याचा उपयोग अविचाराने केल्यामुळे ज्यावेळी शरीर असंख्य व्याधींनी ग्रस्त होते तेंव्हा निर्माण होणारी सद्‌बुद्धी, हे वेळ निघून गेल्या नंतरचे शहाणपण आहे. आपल्या शहाणपणाचा उपयोग योग्य वेळीच करता आला पाहिजे. देहमंदिरावर आजाररूपी राक्षसी हल्ले होऊ लागल्यावर आम्ही जागे होतो. त्यानंतर वैद्यकीय इलाज करणे सुरू होते. पण एकदा का आजाररूपी हल्ले सुरू झाल्यावर बचावात्मक पवित्रा घेऊन करण्यात येणारे इलाज किती परिणामकारक ठरतील याची शाश्वती देता येत नाही. मनाचे आणि विचारांचे सामर्थ्य कोणत्याही औषधापेक्षा श्रेष्ठ असते. तेंव्हा त्या सामर्थ्याचा विचार आम्हाला केंव्हाच पडता कामा नये.

आपल्या आरोग्यावरच आपले मन, बुद्धी, भावना ह्यांची अवस्था अवलंबून असते. मनाविषयी विचार करताना अंतर्मन व बहिर्मन अशा दोन्ही अवस्थेचा विचार प्रामुख्याने आपल्याला करावा लागेल. दोन्ही मनात सुरू असलेले द्वंद्व हे बरेच वेळा न संपणारे असते. याचे महत्वाचे कारण अंतर्मनात सुरू असणाऱ्या आंतरक्रिया बहिर्मनाशी जुळत नाहीत. सारांश आत चालले काय, आणि बाहेर दाखवतो काय? अशी अवस्था प्रामुख्याने बऱ्याच युवकांची आपल्याला दिसते.

दिसणे आणि असणे हे जर प्रामुख्याने वेगवेगळे असेल तर आपली नेहमीच फसगत होत राहते. हे दिसणे व असणे इतरांची फसवणूक करण्याच्या संदर्भात नसेल तर एक वेळ ते फारसे घातक ठरणार नाही, पण पुढे असा प्रश्न निर्माण होतो की आपण स्वप्रतारणा का करावी? मुक्त, स्वच्छंदी अगदी निर्मळ झऱ्यासारखं का जगता येऊ नये? बहुतांशी अतिसंकोची, अव्यक्त स्वभावाचे युवक मोठ्या प्रमाणात स्वप्रतारणा करून घेतात. त्याचे महाभयंकर दुष्परिणाम ते भोगत असतात.

असणे आणि भासवणे ही एक प्रचंड कला आहे, असे समजणारे अनेक महाभाग असतात. त्यामुळे अगदी सहजपणे बनवाबनवी करण्यात आपण यशस्वी होतो. हा दृढ विश्वास असण-ारे युवक आपल्या जीवनातील विश्वासाहर्ता तर गमावतातच, पण त्यांच्या अंतर्मनात व बहिर्मनात नेहमीच सुरू असणारे महायुद्ध यांच्या मनोविश्वाचा विध्वंस करीत असते. काही कालावधीची 'अशी ही बनवाबनवी' नेमकी आपल्याला अगदी कडेलोटाच्या शिखरावर कशी घेऊन गेली? त्यानंतर ती आपल्या भवितव्याची 'कशी ही बनवाबनवी' झाली. हे या महान कलाकाराला कळत नाही. जेंव्हा कळते, तेंव्हा त्या कळण्याचा काहीच उपयोग नसतो, कारण चुकीच्या मनो व्यापारा-मुळे त्याने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमावलेला असतो.

युवावस्थेत ही बाब खूप लक्षात घेण्यासारखी आहे, आपण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमविता कामा नये. आपल्या बुद्धीचा होणारा विकास आपल्याला स्वार्थाकडे, कुसंगतीकडे किंवा वामर्गाकडे नेऊ शकतो, पण आपल्या मनाचा आणि भावनेचा विकास आपल्याला केंव्हाच वाईट दिशेने नेऊ शकत नाही. मन, भावना आपल्याला मानवी शरीरातील यंत्र बनू देत नाहीत. आपल्या अगोदर इतर व्यक्तीच्या सुख-दुःखाचा विचार करायला लावते ते मानवी मन. ते आपल्याला या पर्यावरणातील प्रत्येक जीवसृष्टीचा विचार करायला लावते. पशु, पक्षी, प्राणी, वृक्ष, वल्ली या चराचरांत ते आपल्याला आत्मा आणि परमात्माचा विचार करायाला लावते. जेंव्हा बाल्यावस्थेपासून मानवी जीव हा विचार करायला लागतो. तेंव्हा त्याला वेगळ्या ईश्वरभक्तीची गरज नाही. तो प्रत्येक जीवाशिवातील ईश्वरापर्यंत पोहचतो. तो जीवसृष्टीत एकरूप होतो. तो मानवी जीवनाचा खरा आनंद घेतो. इहलोकीचा मोक्ष तोच पाहतो आणि क्षणोक्षणी ईश्वरभक्तीचा आनंद तोच घेतो.

ईश्वर आपले मनोरथ तेंव्हाच पूर्ण करेल जर तुमचा प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास असेल. माउलीने पसायदानात उल्लेख केला. जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात, पण याचा अर्थ समजून घेतांना केवळ भक्तीने ते प्राप्त होऊ शकणार नाही. त्याला तुमची अपार मेहनत, शक्ती, बुद्धी, नियोजन सर्वच गोष्टीची जोड हवी. ईश्वरभक्ती यासाठी आवश्यक आहे. मला सद्‌विचाराचा व सत्कार्याचा विसर पडू नये. माझ्या मनात राग, द्वेष, कुवासना, लालसा निर्माण होऊ नये. इतरांचे सुख, आनंद पाहून माझ्या मनात द्वेष निर्माण होऊ नये. मला माणूस म्हणून आनंदात जगता यावं. प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात सकारात्मक विचारांचा वास असावा. ईश्वरभक्ती, नामस्मरण यासाठी आहे. ईश्वरभक्तीचे केवळ नाटक करून सर्वसामान्यांची फसवणूक करणारे काही थोडे नाहीत. मनुष्य वर्तनासंबंधी विचार केला असता 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असणारच. मनुष्यवर्तनासंबंधी निश्चित निष्कर्ष काढणे खूप कठीण आहे. मनुष्यजीवन असंख्य अनिश्चीततेने, संघर्षाने व थोडक्यात युद्धाने भरलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,
रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।।
अंतर्बाह्य जग आणि मन।।

ज्याचा मन आणि भावनांवर ताबा तो जग जिंकू शकतो. त्याला अशक्य असे काही नाही. मन आणि भावना ताब्यात ठेवण्यासाठी आमच्या विचारांची व्यापकता वाढवून मनोनिग्रह करणे आवश्यक आहे. आमच्या युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळो व ही शक्ती राष्ट्र कार्याच्या सत्कारणी लागो. हीच सर्व ज्येष्ठांची मनोकामना. या देशातील समस्त युवकांना राष्ट्रभक्तीचे महत्व कळेल, तेंव्हा आमच्या देशाचे भविष्य उज्वल असेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज असणार नाही.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# 'हाऊस वाईफ' नव्हे, 'होम मेकर'च



इंग्रजी भाषेमध्ये अनेक चुकीचे शब्द वापरले जातात परंतु अंधानूकरणाची सवय लागलेल्या भारतीय लोकांकडून याचा विचार होत नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास 'हाऊस वाईफ' हा शब्द घ्या. मराठीतील 'गृहिणी' या शब्दासाठी तो पर्यायी शब्द आहे, असं समजले जाते पण ते चुकीचे आहे. 'हाऊस वाईफ' ही फक्त एकाचीच पत्नी असते, पूर्ण घराची नाही, म्हणून तिला हाउसवाइफ म्हणणे हे अत्यंत चुकीचे, बेकायदेशीर आणि अनैतिक आहे, हे उशिरा का होईना लक्षात आल्यामुळे आता या ठिकाणी 'होममेकर' हा शब्द वापरण्यात येतो आहे. मराठीतील 'गृहिणी' हा शब्द अत्यंत योग्य आहे. जी घराला आकार देते ती गृहिणी, असा याचा अर्थ आहे. परंतु आपल्याकडे गृहिणी म्हणजे घरात बसून राहणारी, असा चुकीचा समज करून देण्यात आला आहे आणि याचे परिणाम तिच्या मानसिकतेवर आणि कार्यक्षमतेवर होत आहे. पण आता उशिरा का होईना, घर सांभाळणारी, मुलांची काळजी घेणारी आणि कुटुंबाचा गाडा सुरळीत चालवणारी पत्नी 'निष्क्रिय' असते, हा समाजातील प्रस्थापित समज कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही, असे स्पष्ट मत दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

पोटगी ठरवताना केवळ स्त्रीचे प्रत्यक्ष आर्थिक उत्पन्न पाहणे पुरेसे नसून, विवाहाच्या काळात तिने दिलेल्या घरगुती योगदानाचे आर्थिक मूल्यही लक्षात घेतले पाहिजे, असा महत्त्वपूर्ण निकाल न्यायालयाने दिला आहे. प्रथमताच एखाद्या प्रकरणांमध्ये न्यायालयाने असे मत व्यक्त केले असावे जे व्यवहाराशी तंतोतंत मिळते जुळते आहे. नोकरी नसणे आणि निष्क्रिय असणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. गृहिणीचे श्रम हे थेट उत्पन्नात मोजले जात नसले, तरी त्या श्रमांमुळे कमावणाऱ्या जोडीदाराला बाहेर जाऊन काम करण्याची मोकळीक आणि स्थैर्य मिळते. त्यामुळे तिच्या योगदानाकडे दुर्लक्ष करणे अन्यायकारक ठरेल. खरंतर आपल्या देशाची मूळ संस्कृती ही स्त्रियांनी जपली आहे.

मुलांवर संस्कार देखील घरातली स्त्रीच करीतअसते. पुरुष तर बराच काळ नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरच असतो. या दृष्टीने देखील तिचे महत्त्व आधारित होते .घराचे व्यवस्थापन, मुलांचे संगोपन, कुटुंबाला भावनिक पाठबळ देणे, तसेच पतीच्या नोकरीसाठी स्थलांतर किंवा बदलांना स्वतःला जुळवून घेणे ही सर्व कामे 'अदृश्य' असली, तरी त्यांना आर्थिक मूल्य आहे. सदर प्रकरणात संबंधित महिला सुशिक्षित आणि सक्षम असूनही तिने नोकरी शोधली नाही, या कारणावरून खालच्या न्यायालयातील विद्वान आणि अनुभवी न्यायाधीशाने तिला अंतरिम पोटगी देण्यास नकार दिला होता. २०१२ मध्ये विवाह झाल्यानंतर २०२० मध्ये पतीने पत्नी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलाला सोडून दिल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. मात्र उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, 'कमाई करण्याची क्षमता' आणि 'प्रत्यक्ष कमाई' या दोन भिन्न बाबी आहेत.

केवळ कमावण्याची क्षमता आहे म्हणून पोटगी नाकारणे कायद्याच्या तत्त्वांशी सुसंगत ठरत नाही. प्रस्थापित कायद्यानुसार, पत्नीला प्रत्यक्ष उत्पन्न नसल्यास तिच्या जगण्याची जबाबदारी पतीवरच येते. विवाहानंतर महिलांनी नोकरी सोडावी किंवा घरावर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा अनेक कुटुंबांमध्ये अजूनही आढळते. अशा परिस्थितीत वैवाहिक वाद उद्भवल्यावर पतीकडून 'उच्चशिक्षित असूनही जाणीवपूर्वक बेरोजगार' असल्याचा आरोप करून पोटगी टाळण्याचा प्रयत्न होतो. परंतु न्यायालयाने ठामपणे नमूद केले की, घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणे हे देखील पूर्णवेळ कामच आहे. त्या कामासाठी वेतन मिळत नसले, तरी त्याचे सामाजिक आणि आर्थिक मूल्य कमी होत नाही, उलट ते पैसे कमावणाऱ्या कार्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे असते. हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, भविष्यातील अनेक वैवाहिक वादांमध्ये मार्गदर्शक ठरू शकतो. पोटगी निश्चित करताना न्यायालयांनी स्त्रीचे शिक्षण, कौशल्य आणि संभाव्य कमाई यासोबतच तिच्या घरगुती योगदानाचाही विचार करणे आवश्यक असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

महिलांच्या अदृश्य श्रमांना कायदेशीर मान्यता देणारा हा निर्णय समाजातील 'गृहिणी म्हणजे निष्क्रिय' या समजाला मोठा धक्का देणारा ठरतो. या निकालामुळे गृहिणींच्या श्रमांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. घरकाम हे केवळ 'कर्तव्य' नसून, कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थैर्यासाठी आवश्यक असलेली जबाबदारी आहे, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पोटगीसारख्या प्रकरणांमध्ये स्त्रीच्या घरगुती योगदानाचे मूल्य मान्य करणे ही केवळ कायदेशीर गरज नसून सामाजिक न्यायाची पायरी आहे, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे.

**-सौ. बी. एम. कदम**
जिजामाता कन्या शाळा,
नांदेड

# जलप्रदूषण; एक गंभीर समस्या

देशातील अनेक शहरांना प्रदूषणाने विळखा घातला आहे. दिल्लीसारख्या देशाची राजधानी असलेल्या शहराची प्रदूषणाने काय अवस्था झाली ते आपण पाहिलेच आहे. आता देशाची आर्थिक राजधानी आणि आपल्या राज्याची राजधानी असलेल्या मुंबईची अवस्थाही दिल्लीसरखीच होताना दिसत आहे. देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरात मुंबई दुसऱ्या स्थानावर आहे. मुंबईची हवा प्रदूषणाच्या सर्वोच्च पातळीवर पोहचली आहे.औद्योगिकीकरण व वाढत्या प्रदूषणामुळे हवेत विषारी वायू मिसळला जात आहे. त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे. निसर्गाने मानवाला भरभरून दिले. हवा, पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. पण मानवाने मात्र या देणगीचा आदर करण्याऐवजी त्यात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळेच प्रदूषणासारखी भीषण समस्या आज निर्माण झाली आहे. केवळ वायू प्रदूषण हीच आजची एकमेव समस्या नाही तर जलप्रदूषण ही देखील वायू प्रदूषणाइतकीच गंभीर समस्या बनली आहे. जगात सर्वात जास्त मृत्यू हे दूषित पाण्यामुळे होत आहेत. संपूर्ण जगात १८० कोटी लोक दूषित पाणी पितात.

प्रदूषण महामंडळाने मागील वर्षी असाच एक अहवाल सादर केला होता त्यानुसार मुंबईतील मिठी व उल्हास या नद्या सर्वाधिक प्रदूषित नद्या म्हणून गणल्या गेल्या आहेत. विदर्भातील वैनगंगा, पैनगंगा, वर्धा या मोठ्या नद्यांसह वेण्णा, कन्हान नद्यांचाही प्रदूषित नद्यांमध्ये समावेश आहे. मध्यप्रदेशात उगम पावलेल्या वैनगंगा नदीचा तुमसर ते आष्टी पर्यंतचा ७०७ किमी चा परिसर अतिप्रदूषित म्हणून गणला गेला आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांचाही सामावेश आहे. या जिल्ह्यातील दुधुस ते राजुरापर्यंतचा ५१ किलोमीटर पर्यंतचा विस्तार प्रदूषणाच्या उच्च श्रेणीत आहे. कन्हान नदीचा नागपूर ते भंडारा पर्यंतचा १०१ किलोमीटरचा विस्तार अतिप्रदूषित श्रेणीत आहे. वेण्णा नदीही त्याच श्रेणीत असल्याचे दिसते. याशिवाय भीमा, कृष्णा, गोदावरी या मोठ्या आणि महत्वाच्या नद्या देखील प्रदूषित आहेत. वारी निमित्त राज्यातील लाखो वारकरी पंढरपुरात न चुकता येतात आणि चंद्रभागेत न चुकता स्नान करतात ; पण आता चंद्रभागा नदीचे पाणी तीर्थ म्हणूनच काय तर स्नान करण्यासही धोकेदायक असल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रभागा नदीच्या पाण्यात घाण, कचरा, शेवाळ, अळ्या, किडे आहेत तसेच ते पाणी मैला मिश्रित असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रदूषणामुळे देशातील नद्यांचे पाणीपिण्यालायक राहिले नाही.

प्रदूषणामुळे केवळ मानावाच्याच नव्हे तर जलचरांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. अर्थात याला आपणच जबाबदार आहोत. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरातील केरकचरा, सांडपाणी, कारखान्यातील रसायन मिश्रित दूषित पाणी, सतत होणारा वाळू उपसा यामुळे नद्या प्रदूषित होत आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने नद्यांचे हे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस पावले उचलायला हवीत. जे कारखाने आपल्या कारखान्यांमधून नद्यांमध्ये दूषित पाणी सोडत असतील त्यांचे परवाने रद्द करायला हवेत. वाळू उपसा थांबवायला हवा. जनतेनेही नद्यांमध्ये सांडपाणी सोडू नये. जलप्रदूषण रोखायची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच ती जनतेचीही आहे. जल है तो कल है... या उक्तीप्रमाणे येणाऱ्या पिढीचे आणि जीवसृष्टीचे रक्षण करायचे असेल तर जलप्रदूषण रोखायलाच हवे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# संस्काराचे जिवंत प्रतीक : श्रीमती साकऱ्याबाई शेटकार



धैर्य, शिस्त, संस्कार, प्रेम आणि आत्मनिर्भरतेचे जिवंत प्रतीक म्हणजे मातोश्री श्रीमती साकऱ्याबाई नागनाथराव शेटकार होत.

त्यांचा जन्म एकलारा या गावी झाला. करडखेड येथील प्रसिद्ध व्यक्तिमत्व असलेले राचन्ना शेटकार यांच्या नागनाथ या शेतकरी मुलाशी त्या काळातील परंपरेप्रमाणे लहान वयात त्यांचा विवाह झाला. आई-वडिलांचे संस्कार घेऊन सासरी आलेल्या श्रीमती साकऱ्याबाई शेटकार ह्या सुशिक्षित नव्हत्या तरी पण कधीच घरकाम, शेत कामा पुरत्या मर्यादित न राहता घरचा कारभार सांभाळण्यात समर्थपणे योगदान दिले. आपले आयुष्य जगत असताना भूकेलेल्यांना अन्न, वस्त्रहिनांना वस्त्र, प्राणीमात्रावर दया हा त्यांचा स्वभाव धर्म होता.

श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या २ मुली व ४ मुलांना घडवण्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे. श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांना माधव, अनिल, शंकर व सुरेश हे चार मुले, यातील ज्येष्ठ सुपुत्र माधव शेटकार यांचं अकाली निधन झाले तर अनिल शेटकार हे नांदेड येथील प्रसिद्ध उद्योजक आहेत. शंकर शेटकार हैदराबाद येथे उद्योजक आहेत, तर सुरेश शेटकार हे उदगीर येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत, आणि सौ. लक्ष्मीबाई मोघे-पाटील व शकुंतला धणुरे-पाटील या दोन मुली या सर्व बहीण, भावंडांचं आदर्श कुटुंब ठेवण्यात श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांचा सिंहाचा वाटा आहे. श्रीमती साकऱ्याबाई शेटकार शाळेत प्रवेश घेऊन साक्षर झाल्या नव्हत्या, पण त्यांना अक्षर ओळख होती. रामायण, महाभारत, पांडव प्रताप पोथी त्या काळात गावोगावी असायच्या. गावात चालू असलेल्या दररोजच्या पोथी सोहळ्यात आपल्या मुलांना घेऊन त्या नेहमीच जायच्या. ग्रंथातील शिकवण अंगीकृत करून महात्मा बसवेश्वर यांची प्रेरणा घेऊन स्वतःला शिक्षण घेता आलं नाही म्हणून त्यांनी आपल्या मुला-मुलींना उच्चशिक्षित करून इतरांमध्ये शिक्षणाचे महत्व रूजवले.

रिकाम्या वेळेत त्यांनी रामायण, महाभारत कथेचा विस्तार मुलांना सांगायच्या, म्हणून आज त्यांची सर्व मुले सुसंस्कारित असल्याचे पाहायला मिळते हे विशेष. आज सोळा वर्षांपूर्वी पती नागनाथराव शेटकार यांचे अकाली निधन झाले आणि नंतर त्यांच्या मोठ्या मुलाचाही मृत्यू झाला. हे सर्व श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या डोळ्यासमोर घडलं तरीही त्यांनी आपलं पुढचं जीवन धार्मिक, सामाजिक कार्यात लावून समाजात सन्मानाने उभे राहिल्या. उर्वरित काळात त्यांनी स्वतःच्या इच्छे-प्रमाणे आपल्या मुला-मुलींसोबत राहून नातवंडांचा आनंद द्विगुणीत केला. काही स्त्रिया केवळ आयुष्य जगत नाहीत तर ते आपल्या कणखरपणातून इतिहास घडवतात असे म्हटले तर श्रीमती साकऱ्याबाई शेटकार यांच्या बाबतीत वावगे ठरणार नाही.

श्रीमती साकऱ्याबाई नागनाथराव शेटकर यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन व कोटी कोटी प्रणाम..!

**-प्रल्हाद आयनेले,**
नांदेड
मो. ९८९०६१६३०१

## थोडक्यात...

### श्री दत्तप्रभू प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)** – श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी होते. प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स. शि. सौ. हिवराळे एस. डी. यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पी. जी. नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स. शि. सौ. आगलावे आर. पी., सौ. पापुलवार एस. एन., गायकवाड ए. एस., काळे जी. एस. यांनी विशेष परिश्रम घेतले.

### रुद्रांश येवतेने पटकावला टॉपर अवॉर्ड

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड येथे मेंटल मॅथ्स अँड बॅकस टीचर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित पहिल्या



'ओपन टू ऑल' बॅकस आणि मॅथ राज्यस्तरीय स्पर्धेत रुद्रांश अभिजीत येवते याने देदीप्यमान यश संपादन केले आहे. रुद्रांशला या स्पर्धेत प्रतिष्ठेचा 'टॉपर अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. रुद्रांशच्या या यशाबद्दल त्याचे आजी-आजोबा, सौ. अनिता दत्ता (मामा) येवते व शिक्षकांनी कौतुक केले.

# साधु, संत, महंत, वारकरी संप्रदायामध्ये वाद निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे महतांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** – साधु, संत, महंत व वारकरी संप्रदायामध्ये वाद निर्माण करणाऱ्यांवर कठार कारवाई करा, अशी मागणी महतांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील कै. चंद्रभागाबाई मारोतराव टिप्पलवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त हरिकीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या धार्मिक कार्यक्रमा दरम्यान साधू, संतांच्या चारित्र्यावर सार्वजनिक ठिकाणी भाष्य करून पूर्ण साधू, संत, महंत व महामुनी यांच्या भगव्या वस्त्रास अश्लील शब्दात भाष्य करणे गैर आहे. साधू, संत, महाराज व सनातन धर्माच्या संप्रदायाच्या प्रतिमेला बोलल्यामुळे त्यांच्या भावना दुखावल्या. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व साधू-संत महाराज यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन देऊन साधू, संत आणि सनातन धर्मविरोधी एकेरी भाषेत उल्लेख करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, अशा मागणीचे निवेदन



श्री दशनाम दत्त आखाडा सुरक्षा न्याय महाराष्ट्र यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना सोमवारी दिले आहे.

नायगाव तालुक्यातील बरबडा येथे हरीकीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी अपशब्द वापरणारे भगवान शंकर पवळे हे उमरी तालुक्यातील पळसगाव येथील रहिवासी असून, कीर्तन करत असताना साधू-संतांच्या चारित्र्यावर व सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमात संत, मुनी यांचे भगवे कपडे आम्ही देतो मग त्यांना अकराशे रुपयांची दक्षिणा कशाला पाहिजे? अशा शब्दांत ते बोलले, त्यामुळे सर्व साधू, संतांचा अपमान करणारा शब्द त्यांनी वापरून एकेरी भाषेत बोलणे हे आपल्या धर्मात शोभत नाही. साधू, संतांना दुधाच्या आंघोळी महिलांनी का घालाव्यात? साधुसंत, महंत हे स्वतः आंघोळ करण्यास असमर्थ आहेत का? व ते अपंगत्व आहेत का? सर्व साधू, संतांना व सनातन धर्माचा व सनातन धर्मातील साधुसंतांना आम्हीच सर्व सुख सुविधा पुरवतो, त्यांना पैसा, सोने-चांदी, चांगले खाणे- पिणे कशासाठी लागते? अशा एकेरी भाषेत उल्लेख केला आहे. जे साधुसंत सर्व धर्माला चांगले मार्गदर्शन करून हिंदू धर्माची शिकवण देण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत असतात, त्यामुळे आमच्या सर्व साधुसंतांच्या भावनाचा एकेरी भाषेत उल्लेख करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी साधू, संतांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी नांदेड जिल्ह्यातील सर्व साधु, संत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्वारातीम' विद्यापीठ आणि महानगरपालिकेच्या संयुक्त पुढाकारातून समाजोपयोगी संशोधनासाठी बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्थानिक समस्यांवर संशोधनात्मक उपाययोजना शोधण्यासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व महानगरपालिका यांच्यात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर, पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत समाजोपयोगी प्रकल्पांवर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्वारातीम विद्यापीठ व पालिका प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील विविध विभागांतील तज्ज्ञ प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थी नांदेड शहराच्या नागरी समस्यांवर जसे की, पाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, आरोग्य इत्यादीवर वैज्ञानिक पद्धतीने उपाय शोधणार आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या पायाभूत सुविधा आणि विद्यापीठाचे ज्ञान यांचा वापर करून 'स्मार्ट सिटी' आणि 'शाश्वत विकास' या संकल्पना राबविण्यावर चर्चा झाली. विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप आणि 'अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत महानगरपालिकेत कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. तसेच सामाजिक उत्तरदायित्व म्हणून आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणासाठी विद्यापीठ प्रशासन पथक आणि महानगरपालिका संयुक्तपणे मोहिमा राबवणार आहेत.

आजमितीस महानगरपालिका शहरी भागांमधील प्रमुख प्रश्न लक्षात घेता विद्यापीठातील तज्ज्ञ संशोधकांनी नागरी समस्यांविषयी प्रामुख्याने डास नियंत्रण व निर्मूलन, व्हायरल आजार प्रसार नियंत्रण व जलनिस्सारण आणि घनकचरा व्यवस्थापन मॅपिंग या विषयांवर तज्ज्ञ प्राध्यपकांनी महापालिका अधिकाऱ्यांना उपाययोजनेचे सादरणीकरण केले. विद्यापीठात मलेरिया, डेंग्यू, सर्पदंश इत्यादीचे नमुणे तपासणीची सुविध उपलब्ध असून, या उपकरणांचा उपयोग शहरातील नागरिकांना पालिकेच्या माध्यमातून व्हावा, अशी भावना यावेळी कुलगुरु मनोहर चासकर यांनी व्यक्त केली.

## एमजीएममध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** – एमजीएम कॅम्पसमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर आणि उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांच्या मार्गदर्शनात शिवजमोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सर्वप्रथम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मानद प्राचार्या डॉ. अर्चना राजूरकर यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन हार अर्पण करण्यात आला. तसेच बालशिवाजीची प्रतिमा असलेल्या पालखीचेही विधीवत पूजन करण्यात आले.

जयंतीनिमित्त अभियांत्रिकी आणि संगणकशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने यावेळी नेत्रदीपक लेझीम नृत्य सादर केले. पंचवीस विद्यार्थ्यांच्या ढोल पथकाने श्रवणीय ढोल वाजवून उपस्थितांत नवचैतन्य निर्माण केले. जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावरील भिंतीवर शिवरायांचे भलेमोठे पोस्टर प्रकाशित केले आणि विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा एकच गजर केला.

बाल शिवाजी असलेल्या पालखीची मिरवणूक महाविद्यालयातून काढण्यात आली.

यावेळी कॅम्पसमधील ग्रंथालय-शास्त्र महाविद्यालयाचे डॉ. गोविंद हंबर्डे, पत्रकारिता विभागाचे डॉ. गणेश जोशी, कला महाविद्यालयाचे प्रोफेसर महेश महामुने, डॉ. कांचन नांदेडकर तसेच विविध विभागप्रमुख डॉ.जसबीरसिंग सिद्धु, डॉ. कल्पना जोंधळे- पैठणे, प्रोफेसर नारायण कदम, प्रोफेसर मनिषा जोशी, प्रा. सत्पालसिंग गिल, डॉ. गोंड, डॉ.भोपी आदींसह विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुकाई जीएनएम नर्सिंग स्कूलचा शपथविधी समारंभ संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – श्री अद्वैत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचालित तुकाई जीएनएम नर्सिंग स्कूल (महाराष्ट्र राज्य नर्सिंग व पॅरामेडिकल शिक्षण मंडळ, मुंबई संलग्न), तरोडा, नांदेड यांच्या वतीने आयोजित शपथविधी समारंभ उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.



नर्सिंग क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेवाभाव, शिस्त, प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकी जपण्याची शपथ घेत व्यावसायिक जीवनाची नवी सुरुवात केली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पंढरी पोतुलवार यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. बालाजी पोतुलवार व डॉ. सूर्यकांत थोरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. पोतुलवार म्हणाले, नर्सिंग ही केवळ नोकरी नसून मानवतेची शपथ आहे. रुग्ण कोणत्याही जात-धर्माचा, श्रीमंत-गरीब असो; त्याच्याकडे 'तो माणूस आहे' या भावनेने पाहणे हीच खरी नर्सिंगची ओळख आहे. सावित्रीबाई फुले यांच्या प्लेगसाथीतील सेवाकार्याचा संदर्भ देत त्यांनी निर्भय सेवा, करुणा व कर्तव्यभावना यांचे महत्त्व अधोरेखित केले. नर्सिंगमध्ये ज्ञान महत्त्वाचे असले तरी कर्तव्यनिष्ठा अधिक महत्त्वाची आहे. अनेकदा औषधापेक्षाही नर्सचा दिलासा देणारा शब्द रुग्णाला जगण्याची शक्ती देतो, असे ते म्हणाले. रात्रीच्या ड्युटीत सतर्कता ठेवणे, रुग्णाशी संयमाने वागणे, स्वच्छता व वेळेचे भान राखणे हीच खरी व्यावसायिकता असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निशिकांत एकलारे (एम.डी., डी.एम. न्यूरोलॉजी) तसेच विशेष मान्यवर डॉ. विद्या एकलारे (डी. एन.बी. जनरल सर्जरी) उपस्थित होत्या. ॲड. जमनिक एम.आर., ॲड. अंभोरे, पी.एस.आय. आकाश सरोदे, डॉ. नरेंद्र बैनवाड, डॉ. अमितकुमार पोतुलवार व डॉ. तेजस्विनी पोतुलवार यांचीही उपस्थिती लाभली.

यावेळी गतवर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूजा मेंडे यांनी केले. प्राचार्या आश्विनी शिंदे तसेच ट्यूटर माधव पोकळे, प्राप्ती थोरात व शुभम पोकळे आदींची उपस्थिती होती. प्रेरणादायी मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला असल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या.

## स्वारातीम विद्यापीठात संत गाडगे बाबा जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये सोमवार, दि. २३ फेब्रुवारी, रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, सहा. कुलसचिव रामदास पेद्देवाड, अनिरुद्ध रेहगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधीक्षक के. डी. पाटील, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे, हेमलता पाटील व शिवाजी चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## छत्रपती शिवाजी महाराज पुतळा विटंबन; आरोपीवर कारवाई करण्याची सकल मराठा समाजाची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना व शिवभक्त महिलेचा विनयभंग करणाऱ्या समाजकंटकांविरुद्ध सामूहिक गुन्हा नोंदवून कडक शासन करण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला येथे काही समाजकंटकांनी जाणीवपूर्वक कट रचून आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केली. हा प्रकार केवळ एका पुतळ्याचा अपमान नसून, संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेवर आणि करोडो शिवभक्तांच्या श्रद्धेवर केलेला सुनियोजित हल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे बलस्थान आहेत. या घटनेचे व्हीडीओ आणि माहिती मोनल मीडियावर प्रसारित झाली आहे. ती पाहून नांदेडमधील समस्त शिवभक्त, महिला वर्ग आणि तरुणांच्या धार्मिक व सामाजिक भावना अत्यंत तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत. या घटनेमुळे नांदेडमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, हिंदू धर्माच्या आणि शिवप्रेमीच्या अस्मितेचा जाणीवपूर्वक अपमान करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## अर्धापूर नगरपंचायतीने राबविले स्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– हाती झाडू, मुखी राष्ट्रसंतांचे नाव अशा उत्साही वातावरणात अर्धापूर शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. निमित्त होते थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे. केवळ हार-फुले अर्पण करून औपचारिकता न पाळता, प्रत्यक्ष कृतीतून गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जपत नगरपंचायत प्रशासनाने शहरात स्वच्छता अभियान राबविले.

या मोहिमेची सुरुवात शहरातील गजबजलेल्या बसस्थानक परिसरापासून झाली. 'स्वच्छता हीच सेवा' हा मंत्र जपत लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी स्वतः रस्त्यावर उतरले. सार्वजनिक ठिकाणांवरील साचलेला कचरा, प्लास्टिक आणि अस्वच्छता दूर करून परिसराचा चेहरामोहरा बदलण्यात आला. प्रारंभी मोहिमेच्या सुरुवातीला गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छतेचा निर्धार करण्यात आला. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे केवळ आदेश न देता मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्यासह सर्व विभागांच्या प्रमुखांनी स्वतः हातात झाडू घेऊन श्रमदान केले. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हा उत्साह पाहून नागरिकांमध्येही स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश गेला.

स्वच्छता अभियानात लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखॉन पठाण, मुख्याधिकारी: जगदीश दळवी, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, व्यंकटी राऊत, ड.योगेश माटे सर्व नगरसेवक व कर्मचारी सहभाग होते.

प्रशासकीय पथकाचा सक्रीय सहभाग घेत केवळ औपचारिकता न पाळता प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही हातात झाडू घेऊन श्रमदान केले. यावेळी नगर अभियंता संदीप वानखडे, स्वच्छता निरीक्षक कैलास गायकवाड, लेखापाल रामसिंग लोध यांच्यासह शरद चापके, अक्षय कांबळे, सुंदर सरगर, विशाल वाघमारे, विश्वास चिलकेवाड, संदीप बागुल व नगरपंचायतीच्या स्वच्छतादूतांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी मुख्याधिकारी जगदीश दळवी म्हणाले की, केवळ आजचा दिवस नव्हे, तर 'स्वच्छ अर्धापूर, सुंदर अर्धापूर' हे आमचे कायमस्वरूपी ध्येय आहे. नागरिकांनी कचरा कुंडीतच टाकावा आणि शहराला प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी सहकार्य करावे, हीच गाडगेबाबांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करणाऱ्यास दहा हजार रुपये दंडासह २० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)**– एका पंधरा वर्षीय मुलीवर तिच्या आई-वडिलांच्या कायदेशीर ताब्यातून पळवून नेऊन लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीस २० वर्षे सक्तमजुरी व रोख १० हजार रुपये दंडाची शिक्षा मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी बिलोली येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश विजयकुमार बोहरा यांनी सुनावली.

बिलोली तालुक्यातील एका पंधरा वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आला होता. ही घटना २४ सप्टेंबर २०२३ रोजी घडली होती. याप्रकरणी आरोपी रामदास मोतीराम काचेबोईनवाड याच्यावर बिलोली पोलीस ठाण्यात भादवी कलम ३६६, ३७६ (दोन) (एन) व ३७६ (३) या सोबतच पोक्सो कलम ४ व ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक ज्योती बळेगावे यांनी करून आरोपीला अटक केली होती. त्यानंतर तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयाने या प्रकरणात काही साक्षीदार तपासले.

पोलिसांच्या तपासातील पुरावे आणि पीडितेचा जबाब महत्त्वाचा ठरला. तसेच सरकार पक्षाच्यावतीने ॲड. एस. बी. कुंडलवाडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने उपलब्ध पुराव्याआधारे आणि पोक्सोच्या कलम ६ प्रमाणे आरोपी रामदास काचेबोईनवाड याला रोख दहा हजार रुपये दंड आणि वीस वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली.

## लोहा येथे आज पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व वीर माधवराव नळगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून वीर माधवराव नळगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लोहा येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजक, शाळा व महाविद्यालय तसेच इतर खाजगी आस्थापनांमध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी nandedrojgar01gmail.com आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## उत्तर देणारी व्यवस्था निर्माण केल्यामुळे स्वराज्य उभे राहिले -प्रा. हनुमंत भोपाळे

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वराज्य निर्माण करताना छत्रपती शिवाजी महाराजांसमोर अनेक अडचणी, अडथळे, समस्या आणि प्रश्न होतेफ या प्रश्नांना त्यांनी अतिशय कल्पकतेने उत्तर देणारी यंत्रणा उभी केल्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य निर्माण होऊ शकले.आपण आपल्या जीवनातील प्रश्न, समस्या, अडचणी आपोआप सुटतील म्हणून वाट न बघता त्या प्रश्नांना उत्तर देणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. वाटच पाहात बसल्याने प्रश्न सुटत नाही, नैराश्य आणि अपयश येते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते साहित्यिक प्रो.डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे यांनी केले. ते श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित कॉलेज ऑफ एज्युकेशन, नांदेडने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणेचा



हिमालय ह्या विषयावर व्याख्यान देताना प्रमुख वक्ते या नात्याने बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झालीफ अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सरिता पाटील ह्या होत्या. डॉ. हनुमंत भोपाळे पुढे बोलताना म्हणाले, 'शिवछत्रपतींच्या चरित्राच्या वाचन, चिंतन आणि मननाने आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण होऊन उदास होऊन बसलेला माणूसही कार्यशील आणि प्रगतीशील बनतो, एवढी ताकद छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रात आहे. प्रेरणेच्या बळावर अडचणीचे पर्वत हलवता येतात आणि ज्यांच्या प्रेरणा संपल्या ते जागचे हालत नाहीत. अशा निरास, उदास होऊन बसलेल्यांना शिवछत्रपतींचे चरित्र वाचायला द्या, चरित्र ऐकवा, तो पुन्हा यशासाठी सिद्ध होईल. उदात्त ध्येयनिष्ठा, तनमनधन साधना, कल्पक नियोजन, आत्मसंयम, दृढ इच्छाशक्ती, आत्मविश्वास, समर्पण, निर्भयता, दूरदृष्टी, गुणग्राहकता आणि संघटनशक्तीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य आणि क्रूरशक्ती परकियशक्तींला बाजूला सारून स्वराज्य निर्माण करून दाखवले. या अलौकिक कार्याची प्रेरणा घेऊन जगणाऱ्या माणसांच्या कार्याला यश येते. जगातील अनेक यशस्वी लढ्याची प्रेरणा शिवाजी महाराजांचे चरित्र आहे. कधी थोडा वेळ अपयश आले तरी खच्चून न जाता अपयशाचे रूपांतर यशात करण्याची शक्ती देणाऱ्या शिवाजी महाराजांचे चरित्राचे पारायण घराघरांत, गावागावांत झाले पाहिजे, असे प्रो. हनुमंत भोपाळे यांनी सांगितले.

या प्रसंगी छात्र-अध्यापक आदर्श टाक, पूजा कदम, गणेश फुलारी, चंदना कल्याणकर व स्नेहल जाधव यांनी भाषणं, पोवाडा व देशभक्तीपर गीतं सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन प्रतिभा कदम यांनी केले, तर आभार देवेंद्र सूर्यवंशी यांनी मानले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेशकुमार नळगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जोशी एम. आर. डॉ. संजीवनी चव्हाण, ग्रंथपाल राम कदम, कार्यालयीन कर्मचारी स्वप्निल दरणे, शरद घोगरे आणि सर्व छात्र-अध्यापक यांनी मोलाचे सहकार्य केले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



# केवळ गॉगल घालून मिटणार नाही काळजी

**उन्हाळा म्हटले की आठवतो तो प्रचंड उकाडा, घामाच्या धारा आणि होणारे विविध आजार! तापमानबदलामुळे होणारे सर्दी- खोकला, घामामुळे होणारे त्वचाविकार यासाठी आपण आपल्या परीने काळजी घेत असतो. पण उन्हाळ्यात डोळ्याची निगा राखणेही गरजेचे आहे. डोळ्यांचे अनेक विकार उन्हाळ्यात होतात. उन्हापासून बचावासाठी आपण गॉगल वापरतो, पण पण उन्हाळ्यातली डोळ्यांची काळजी केवळ गॉगल घालून मिटणार नाही...**

## उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी घ्या

**मार्च, एप्रिल आणि मे हे महिने कडक उन्हाचे आणि परीक्षांचे. धूळ, धूर, मातीचे बारीक कण आणि वाढत्या उन्हामुळे डोळ्यांचा त्रास कमी करण्यासाठी भरपूर पाणी प्यावे व थंड पाण्याने डोळे दिवसातून ४-५ वेळा स्वच्छ करावेत, असा सल्ला नेत्रतज्ज्ञांनी दिला आहे.**



वसंत ऋतूमध्ये झाडांची पानगळ सुरू होते. हळूहळू उन्हाचा कडाका आणि मग डोळ्यांच्या तक्रारींनाही सुरुवात होते. उन्हाळ्यात प्रामुख्याने डोळ्यांना होणारे त्रास- अतिनील किरणांमुळे पारदर्शक पटलास व नेत्रपटलास इजा होते. पारदर्शक पटलास होणाऱ्या इजेस फोटोकेराटिटिस असे म्हणतात. यामध्ये डोळा दुखणे, डोळ्यातून पाणी येणे, डोळा लाल होणे या समस्या प्रामुख्याने जाणवतात. डोळ्यांना जंतुसंसर्ग होऊ नये यासाठी तज्ज्ञांना दाखवून तातडीने उपचार करून घेणे आवश्यक आहे. नेत्रपटलास यूव्ही लाईटमुळे इजा झाल्यास नजर कमी होण्याचा धोका असतो. म्हणून यूव्ही लाईट्समुळे पापण्यांच्या त्वचेसही सनबर्न होऊ शकतो. त्यासाठी योग्य ती काळजी घेतली तर उन्हाळ्यातील डोळ्यांचे आजार सहज टाळता येऊ शकतात. उन्हामध्ये घराबाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा रुमाल, स्कार्प वापरणे, यूव्ही-ए व यूव्ही-बी या दोन्हीही किरणांपासून शंभर टक्के संरक्षण करणारे सनग्लास वापरणे योग्य ठरते. डोळ्यांजवळ व्यवस्थित बसणारे सनग्लास वापरावेत. तो सनग्लास बी २ इतका काळा असणे गरजेचे आहे. यूव्ही-रॉयजपासून संरक्षण करणाऱ्या कॉन्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. सनग्लास व कॉन्टॅक्ट लेन्स दोन्ही एकदम वापरणे योग्य ठरते. वसंत ऋतूमध्ये झाडांची होणारी पानगळ, हवेत पसरणारे परागकण, हवेतील धूळ यामुळे डोळ्यांना ॲलर्जी होते. विशेषतः चार ते दहा वर्षे वयोगटातील मुलांना जास्त ॲलर्जी होते. यामध्ये डोळ्यांना खूप खाज येते. डोळे लाल होतात. डोळ्यातून पाणी येते. तसेच डोळ्यातून पांढरा दोरीसारखा व्हाईट रापी डिस्चार्ज येणे या तक्रारी जाणवतात. विशेष म्हणजे ॲलर्जी वसंत ऋतूमध्ये होत राहते म्हणून यास स्प्रिंग कॉन्टॅक्ट असे म्हणतात. तेत्रतज्ज्ञांना दाखवून पुढील औषधे सुरू करणे गरजेचे असते. स्टेरिऑड (माइल्ड) आय ड्रॉप जास्त ॲलर्जी असल्यास, ॲलर्जी प्रतिबंधक (ॲन्टी-ॲलेर्जिक) व ॲन्टी-हिस्टामिनिक आय ड्रॉप आर्टीफिशियल (कृत्रिम) अर्टीफ्युल टीअर्स... या औषधांबरोबरच सतत डोळे थंड पाण्याने धुणे, डोळ्यांवरती थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे, डोळे चोळू नयेत यासारख्या गोष्टी कराव्यात. डोळे थंड पाण्याने धुताना डोळे उघडे ठेवून धुवू नयेत. डोळे उघडे ठेवल्यामुळे डोळ्यातील नैसर्गिक अश्रू धुतले जातात. अश्रू व पाण्याचा पीएच वेगळा असल्यामुळे डोळे चुरचुरू लागतात. हवेतील उष्मा वाढल्यामुळे डोळ्यांतील अश्रूंची लवकर वाफ होऊन डोळे कोरडे पडू लागतात. डोळे कोरडे पडल्यामुळे डोळ्यांची आग होणे, डोळ्यांना टोचणे, पाणी येणे असे त्रास होऊ लागतात. म्हणून डोळे सतत थंड पाण्याने धुणे, कोल्ड कॉम्प्रेस, अर्टीफ्युअल टीअर्स ड्रॉप वापरणे योग्य ठरेल असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. अतिनील किरणांमुळे मोतिबिंदू म्हणजे डोळ्यावर पांढरा पडदा येणे अशा समस्याही उद्भवू शकतात. या सर्व उपायांबरोबर आहारात हिरव्या पालेभाज्या, पपई, गाजर, दूध तसेच ताज्या फळांचा रस यांचा समावेश केला तर डोळे निरोगी राहण्यास मोठी मदत होते.

### प्रमुख तक्रारी...

- डोळे दुखणे.
- डोळ्यात काहीतरी टोचल्यासारखे जाणवणे.
- डोळे चुरचुरणे, लाल होणे, डोळ्यांची आग, जळजळ होणे.
- दिवसभर उन्हात वावरल्यावर डोळ्यांवर ताण येणे.
- रांजणवाडी होणे.
- डोळे येणे (विषाणूजन्य कंजंक्टिव्हायटिस).

### सामान्यत : लक्षणे

- प्रथम डोळे थोडे लाल दिसू लागतात.
- पापण्यांच्या आत खाज सुटते.
- सकाळी झोपेतून उठल्यावर डोळ्यांवर थोडीशी सूज दिसते.

### गॉगल वापराच

टोपी, स्कार्फ आणि गॉगल या गोष्टी सध्याच्या उन्हाळ्यात अगदी आवश्यक आहेत. हल्ली रस्त्यावर पन्नास- साठ रुपयांपासून गॉगल विकत मिळतात. पण या गॉगलच्या दर्जाची हमी नसते. त्यांच्या काचांची जाडी कमी-जास्त असण्याची शक्यता असते. त्यामुळे फार महागाचा गॉगल घेतला नाही तरी किमान त्याचा दर्जा तपासून तो खरेदी करा. उष्णता वाढू नये यासाठी एखादा लहानसा कांदा खिशात ठेवला तर उत्तम. कांदा उष्णता शोषून घेणारा असल्यामुळे पूर्वी अनेक जण टोपीत कांदा आवर्जून ठेवत असत.



### डोळे येण्याची लक्षणे कशी ओळखावीत?

डोळे येतात तेव्हा ते आधी लाल होतात, खाजतात, महत्त्वाचे म्हणजे सकाळी उठल्यावर चिकटतात. डोळ्यांमधून पिवळसर किंवा पांढरा स्राव येतो. ही लक्षणे एक-दोन दिवस सतत दिसू लागली तर डोळे येण्याची सुरुवात असल्याचे ओळखावे. अनेकदा डोळ्यांना त्रास होऊ लागल्यावर केमिस्टकडून स्वतःच आय-ड्रॉप आणून डोळ्यात घालण्याची अनेकांना सवय असते. डोळे येण्याची सुरुवात असेल तर काही वेळा या ड्रॉप्समुळे बरेही वाटते. पण घरातल्या एकाला डोळे येण्याची लक्षणे दिसत असतील तर त्याच्यासाठी वापरलेले ड्रॉप्स प्रतिबंधक उपाय करण्याच्या नादात इतरांसाठीही वापरले जातात. आय-ड्रॉप डोळ्यात टाकताना ड्रॉपर डोळ्यांच्या खूप जवळ नेलेला असतो. त्यामुळे ज्या व्यक्तीचे डोळे आले असतील तर त्याचे विषाणू दुसऱ्या व्यक्तीच्या निरोगी डोळ्यांत जाऊन त्याचेही डोळे येण्याची शक्यता असते. शिवाय प्रत्येकाला होणारा त्रास वेगवेगळा असतो. त्यामुळे डोळे येण्यावर स्वतःच्या मनाने उपचार न करता डॉक्टरांकडे जाणेच उत्तम.

### डोळ्यांची काळजी कशी घ्यावी

दिवसातून एक-दोन वेळा तरी काम थांबवून डोळे मिटून पाच मिनिटे शांत बसा. यामुळे डोळ्यांवरचा ताण दूर व्हायला मदत होईल. डोळे चुरचुरणे आणि लाल होण्याचा त्रास असेल तर अशा प्रकारे डोळ्यांना विश्रांती देणे फायदेशीर ठरते. थंड पाण्यात भिजवलेल्या कापडाची पट्टी डोळ्यांवर ठेवूनही बरे वाटते. हा उपाय कार्यालयात असतानाही करता येऊ शकेल. रात्री झोपताना डोळ्यांवर काकडीच्या चकत्या किंवा दुधात भिजवलेल्या कापडाच्या घड्या ठेवून झोपा. दिवसभर दर दीड-दोन तासांनी डोळ्यांवर व चेहऱ्यावर पाण्याचा हबका मारा. दिवसातून एकदा किंवा रात्री झोपण्यापूर्वी गुलाबपाण्याने अथवा गार पाण्याने डोळे धुवा.

### रांजणवाडी



पोट साफ न होणे हे रांजणवाडी होण्याचे एक प्रमुख कारण आहे. पोटातील उष्णता डोळ्यांना होणाऱ्या रांजणवाडीच्या रुपाने बाहेर पडते. पापण्यांवर वरच्या बाजूला तसेच डोळ्यांच्या कोपऱ्यात आतल्या बाजूला अशा दोन्ही ठिकाणी रांजणवाडी होऊ शकते. अशा स्थितीत डोळे दुखू लागले, सुजल्यासारखे दिसू लागले, डोळ्यांच्या आत टोचल्यासारख्या वेदना होऊ लागल्या तरी लगेच डॉक्टरांकडे जाणे आवश्यक ठरते. काही वेळा डोळ्यांत थोडेसे टोचल्यासारखे वाटत असते पण त्याकडे रुग्ण दुर्लक्ष करतात आणि रांजणवाडीचा त्रास वाढतो. त्यामुळे ही लक्षणे वेळीच ओळखणे गरजेचे आहे.

### काय खावे, काय प्यावे...

- नारळ पाणी, लिंबू सरबत, ताक अशी पेये अधूनमधून आवर्जून प्या.
- उन्हात फिरून आल्यानंतर लगेच पाणी पिऊ नका.
- फ्रिजमधील पाण्यापेक्षा माठातले पाणी पिणे चांगले.
- काकडी, टोमॅटो, कोथिंबीर, कांद्याची पात चिरून त्यात मीठ- मिरपूड घालून दररोज जेवणात घ्या.
- रोज पांढरा कांदा खा. हा कांदा तिखट नसतो आणि पाणीदार असतो.

## उन्हाळ्यातील नेत्रदाह

**थंडी ओसरून एव्हाना टळटळीत उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. तापमानाचा पाराही उंचावत आहे. वातावरणातील हे बदल आरोग्यावर परिणाम करणारे ठरतात. उन्हाचा तडाखा जसा वाढू लागतो, तसे डोळे या नाजूक अवयवाच्या तक्रारी वाढू लागतात. डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव. उन्हाळ्यात डोळ्यांचे आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे. या काळात डोळ्यांच्या त्रासाचे मुख्य कारण म्हणजे सूर्याकडून येणारी अतिनील किरणे. धूळ, माती, प्रदूषके, पाण्याची कमतरता अशा अनेक घटकांमुळे आपल्या शरीरातील हा खिडकीरूपी अवयव दुखावला जातो.**




हवेतील उष्मा वाढल्यामुळे डोळ्यांतील अश्रूंची लवकर वाफ होऊन डोळे कोरडे पडण्याची दाट शक्यता असते. उष्म्याचा त्रास होऊन डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. उन्हाळ्यात उन्हासोबत हवाही कोरडी वाहते आणि त्यासोबत धूळ, माती ज्यामुळे डोळ्यांची खाज, डोळे लाल होणे अशी लक्षणे दिसू लागतात. ही लक्षणे उन्हाळ्यात लहान मुले आणि वयोवृद्धांमध्ये प्रकर्षाने जाणवतात. उष्णतेने शरीरातील पाणी कमी होऊन 'डिहायड्रेशन' होते. ज्यामुळे आपल्या शरीरासोबत डोळेही थकतात. उन्हाळ्यात आपल्या शरीराची रोगप्रतिकार शक्ती कमी होते आणि जिवाणू संसर्ग लवकर होतो. दैनंदिन प्रवासातही वाऱ्याचा त्रास अधिक होतो. वाऱ्यामुळे डोळ्यांना इजा होत नाही. मात्र डोळे लाल होणे, सुजणे, कोरडे होणे, रखरखीत होणे असा तात्पुरता त्रास जाणवण्यास सुरुवात होते. उन्हाळ्याच्या सुटीत लहान मुले खूप वेळ उन्हात, धुळीत वा बागेत खेळत असल्यामुळे डोळ्यांना खाज, पाणी येण्याचा त्रास होतो. ज्याला 'ॲलर्जिक कन्ज्युक्टिवायटिस' म्हणतात. जास्त वेळ डोळे चोळल्यामुळे कालांतराने बुब्बुळावर परिणाम होतो. काही मुले उन्हाळ्याच्या सुट्टीत तरण तलावात पोहण्यासाठी जातात. त्यातील क्लोरीनमुळेही मुलांच्या डोळ्यात लाली व खाज येऊ शकते. या परिस्थितीत नेत्रतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार औषध उपचार करायला पाहिजे. सुटीमध्ये घरी बसून मुले टीव्ही बघण्यात वा भ्रमणध्वनीवर खेळ खेळण्यात मग्न होतात. त्यामुळेही डोळ्यांवर परिणाम होतो. आजकाल कार्यालयात, घरी, गाडीत सतत सुरू असलेल्या वातानुकूलित यंत्रणेमुळे डोळे कोरडे पडत आहेत. तसेच संगणक, भ्रमणध्वनी, लॅपटॉपचा वापर अपरिहार्य असला तरी सलग त्याच्या स्क्रीनकडे टक लावून पाहिल्याने डोळे कोरडे होतात.



### या उपायांचा करा अवलंब...

**सध्या धकाधकीच्या जीवनात खासकरून उन्हाळ्यात आपल्या नाजूक डोळ्यांचे आरोग्य जपणे आवश्यक आहे. काही साध्या उपायांनी आपण आपल्या डोळ्यांचे आरोग्य सांभाळून अनेक दुष्परिणामांपासून दूर राहू शकतो.**



- कोरडी व उष्ण हवा आणि अतिनील किरणांपासून बचावासाठी यू. व्ही. रेज संरक्षित गॉगलचा वापर.
- दुचाकी वाहन चालवताना गॉगलबरोबर हेल्मेटचाही वापर करणे.
- तहान लागण्याची वाट न पाहता दर अर्ध्या तासाला पाणी पिणे आणि सोबत आरोग्यदायी शीतपेयांचेही सेवन करणे.
- शक्य तिथे वातानुकूलित यंत्रणेऐवजी कुलरचा वापर करावा. जेणेकरून हवेत ओलावा राहण्यास मदत होते.
- उन्हातून आल्यावर थंड पाण्याने डोळे स्वच्छ करावेत. पण उघड्या डोळ्यांवर पाण्याचा सपका मारू नये. त्याऐवजी एका वाटीत पाणी घेऊन उघडझाप करावी.
- डोळ्यांची जळजळ होत असेल तर स्वच्छ रुमालात बर्फाचे तुकडे घेऊन डोळ्यावर शेकावे.
- डोळे जर चिकटत असतील, लाल होत असतील तर नेत्ररोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.
- नेत्ररोगतज्ज्ञांनी दिलेल्या मात्रेतच 'आय ड्रॉप' टाकावा. त्याचा जास्त वापर डोळ्यांना अपाय ठरू शकतो.
- पुरेशी झोप घेऊन डोळ्यांना आराम द्या तसेच नियमित डोळ्यांचा व्यायाम करावा.
- संगणक, भ्रमणध्वनी, लॅपटॉपवर काम करताना आठवण ठेवत डोळ्यांची उघडझाप करावी. डोळ्यांच्या विश्रांतीसाठी 'लुब्रिकेटिंग ड्रॉप'चा वापर करावा.
- ताजी फळे, पालेभाज्या यांचे नियमित सेवन करावे.

## उन्हाळ्यात सायनसचे प्रमाण का वाढते..?


**उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे शरीरावर नकारात्मक परिणाम होतो. या कालावधीमध्ये वातावरणातील बदलांमुळे सर्दी-पडसं होण्याची शक्यता असते. अशात जर एखाद्याला सायनस असेल, तर त्या व्यक्तीला अधिक त्रास सहन करावा लागतो. उन्हाळ्यामध्ये उष्ण आणि कोरड्या हवेमुळे सायनसचा त्रास वाढत जातो. यामुळे सर्दी, डोकेदुखी आणि ताप असे आजार बळावतात. बऱ्याचजणांना उन्हाळ्यात सायनसचा त्रास सुरू होतो. यावर मात करण्यासाठी डॉक्टरांची मदत घेणे आवश्यक असते. गरम वातावरणामध्ये काही घरगुती उपाय केल्यानेही सायनसचा त्रास कमी होऊ शकतो.**



आपल्याकडे तीन ते चार महिन्यांच्या कालावधीमध्ये कडक उन्हाळा असतो. सकाळी १० ते दुपारी ३ यांमध्ये सूर्य आग ओकतोय की काय इतक्या प्रमाणात उन्हाचा तडाखा बसत असतो. अशा वेळी एसी किंवा पंख्याचा वापर करून थंडावा मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. थंड वातावरणात बसून पुन्हा उन्हामध्ये गेल्याने सर्दी होण्याची शक्यता बळावते. याशिवाय थंड पदार्थ खाल्यानेही अशी स्थिती उद्भवते. अशा वेळी सर्दीसह सायनसचा त्रास व्हायला सुरुवात होते.

### काय करावे?

- गरम पाण्याची वाफ घ्यावी : नाकामध्ये संसर्ग झाल्याने सायनस होत असतो. गरम पाण्याची वाफ नियमितपणे घेतल्याने हा त्रास नाहीसा होऊ शकतो. वाफेमुळे श्वासनलिका स्वच्छ होते. त्याशिवाय संक्रमणासाठी कारणीभूत असलेले विषाणू देखील नष्ट होतात. उन्हाळ्यात कोरड्या हवेमुळे ही नलिका कोरडी होऊ शकते. वाफ घेतल्याने श्वासनलिकेमध्ये ओलावा टिकून राहतो. हा उपाय दिवसातून दोन वेळा केल्याने सायनसवर काही प्रमाणात आराम मिळू शकतो.
- गरमागरम सूप प्यावे : सायनस झालेल्या व्यक्तीची श्वासनलिका घट्ट होते. उन्हाळ्यात हा त्रास वाढत जातो. यावर उपाय म्हणून गरमागरम सूप पिण्याचा सल्ला दिला जातो. दिवसातून दोन वेळा सूप प्यायल्याने श्वासनलिकेला आलेली सूज कमी होते. यामुळे संक्रमणाचे प्रमाण देखील कमी होते. या पदार्थामध्ये विविध मसाल्यांचा समावेश करावा. यामुळे शरीराला फायदा होतो. सूपप्रमाणे हर्बल टी (Herbal Tea) चे सेवन केल्याने सायसनचे प्रमाण कमीकमी होत जाते.



# गरजूंपर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहचविणे हीच खरी देशसेवा -राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू



मुंबइ(प्रतिनिधी)- देशातील गरीब व्यक्तींपर्यंत विनासायास व गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा पोहोचविणे हे आपले प्रमुख ध्येय असले पाहिजे. जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासन सातत्याने कार्यरत असून या क्षेत्रातील नवोपक्रमांना संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जात आहे. प्रत्येक भारतीयाला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पोहचविणे हेच देशसेवेचे महत्त्वपूर्ण अंग असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अधोरेखित केले.

लोक भवन येथील दरबार सभागृहात पी. डी हिंदुजा रुग्णालयाच्या 'जीवन वाचवणे आणि निरोगी भारत निर्माण करणे' या देशव्यापी मोहिमेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या मोहिमेचे उद्घाटन राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, देशात औषधनिर्मिती आणि आरोग्य सुविधांच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. सर्व देशवासी निरोगी राहावेत, यासाठी आयुष्यमान भारत अंतर्गत एक लाखांहून अधिक आरोग्य मंदिर कार्यरत आहेत. तसेच मिशन इंद्रधनुष्य सारख्या उपक्रमांद्वारे लसीकरण मोहिमेला गती देण्यात आली आहे. देशात १२ कोटींहून अधिक कुटुंबांना आयुष्यमान भारत कार्ड वितरित करण्यात आले असून यामुळे लाखो नागरिकांना उपचारांचा आधार मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही तातडीच्या वैद्यकीय सेवांना प्राधान्य देत रुग्णवाहिका सेवा व ट्रॉमा केअर सेंटरच्या सुविधा वाढविण्यावर भर दिला आहे. यासोबतच जनसामान्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यावश्यक आहे. योग्य वेळी उपचारांची माहिती व सुविधा उपलब्ध झाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात, असेही त्यांनी नमूद केले. देशात अनेक महत्त्वपूर्ण औषधांचे उत्पादन होत असले तरी काही वैद्यकीय उपकरणे व औषधे आयात करावी लागतात. ती देशातच तयार व्हावीत यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहनही राष्ट्रपती मुर्मू यांनी केले.

कोविडनंतरच्या काळात मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. एकाकीपणा, उदासीनता यांसारख्या सम स्यांमुळे वैयक्तिक, कौटुंबिक व व्यावसायिक आयुष्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मानसिक आरोग्य सेवाही तितक्याच सक्षमपणे उपलब्ध व्हाव्यात, अशी अपेक्षा राष्ट्रपती मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केली.

वैद्यकीय शिक्षणासाठी पदव्युत्तर पदवीच्या जागा वाढविण्यात आल्या आहेत. दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक राज्यांमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान रुग्णालये सुरू करण्यात आली असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंदुजा हॉस्पिटल समूह यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या जीव वाचविणे, निरोगी भारत निर्माण करणे या अभियानाचे त्यांनी कौतुक केले. वर्षभर चालणाऱ्या या उपक्रमांतर्गत दुर्गम व ग्रामीण भागात रुग्णसेवा पुरविण्यात येणार असून तात्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून जीव वाचविण्याचे पुण्यकर्म या अभियानाच्या माध्यमातून होत असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी काढले.

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले असून, नैसर्गिक जीवनपद्धतीचा अवलंब केल्यास वैद्यकीय क्षेत्रावरील ताण कमी होऊ शकतो. मानव, निसर्ग आणि धरती वाचवण्यासाठी आजारांचे वाढते प्रमाण रोखण्याच्या दृष्टीने वैद्यकीय तज्ञांनी कार्य करण्याची गरज असल्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सांगितले.

कोविड-१९ काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने लसीचा शोध लावून 'सर्वे भवन्तु सुखिनः' या तत्वानुसार जगातील अनेक देशांना लस उपलब्ध करून दिली. गरीब व वंचित घटकांसाठी कार्य करणे हा भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा पैलू असून, त्याच भावनेतून आरोग्य क्षेत्रात सेवा कार्य अधिक व्यापक व्हावे, असे आवाहन राज्यपाल देवव्रत यांनी केले.

हिंदुजा रुग्णालय समूहाच्या वतीने गेल्या ७५ वर्षांत मानवतावादी दृष्टिकोनातून उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देश-विदेशातील रुग्णांना दर्जेदार उपचार देऊन या संस्थेने भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावली आहे, असे त्यांनी सांगितले.ग्रामीण व दुर्गम भागातील वंचित आणि गरजू रुग्णांना सेवा देण्याचे कार्य विशेष महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कॅन्सर, हृदयविकार, किडनीशी संबंधित आजारांच्या मुळावर उपचार होणे अत्यावश्यक असून, दिनचर्या, आहार पद्धती यांचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत वैद्यकीय तज्ज्ञांनी सखोल विचार करणे गरजेचे असल्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सांगितले.

## आंध्रात भेसळीच्या दुधामुळे ४ जणांचा मृत्यू

मुंबई (प्रतिनिधी) - आंध्र प्रदेशातील राजमुंद्री शहरात दोन दिवसांत कथित एन्युरिया (लघवी करण्यास असमर्थता) मुळे चार जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे, ज्याचा संबंध दुधातील भेसळीशी असल्याचा संशय आहे.

रविवारी रात्रीपासून रुग्णालयात उपचार घेत असलेल्यांपैकी दोघांचा मृत्यू झाला. एस. शेषगिरी राव (७२) आणि राधा कृष्णमूर्ती (७४) अशी त्यांची ओळख पटली आहे. आजारी पडलेल्यांपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले आहे.

यापूर्वी दोन मृत्यूची नोंद झाली होती. सर्व बळी पूर्व गोदावरी जिल्ह्यातील राजमुंद्री शहरातील लाला चेरुवू आणि चौडेश्वरी नगर भागातील आहेत. १५ फ ब्रुवारीपासून विविध रुग्णालयात एन्युरियाची लक्षणे आढळून आल्याने किमान १४ जणांना दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा समावेश आहे.

सर्व बाधित कुटुंबांसाठी दूध विक्रेता एकच असल्याने आरोग्य अधिकाऱ्यांना दुधात भेसळ झाल्याचा संशय आला ज्यामुळे अनुरिया होतो.

बहुतेक बळी ६० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. आजारी पडलेल्यांम ध्ये एक तीन वर्षांचा आणि पाच महिन्यांचा बाळाचाही समावेश आहे.

महाशिवरात्री (१५ फेब्रुवारी) रोजी विक्रेत्याने पुरवलेले दूध आणि दही कडू असल्याची तक्रार पीडित कुटुंबांनी पोलिसांकडे केली. पोलिसांनी दूध विक्रेत्या गणेशला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पूर्व गोदावरीचे जिल्हाधिकारी कीर्ती चेकुरी म्हणाले की, शवविच्छेदन तपासणीनंतर मृत्यूचे नेमके कारण कळेल.

## धर्मादाय रुग्णालयांसाठी केंद्र आणि राज्याच्या सरकारी आरोग्य योजना बंधनकारक

मुंबई(प्रतिनिधी)-राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या आरोग्य योजना लागू करणे आता बंधनकारक असणार आहे. निर्धन रुग्ण निधी (आयपीएफ) शिल्लक नसल्याच्या कारणावरून कोणत्याही रुग्णाला उपचारापासून वंचित ठेवता येणार नाही. या रुग्णालयांच्या राखीव निधीचा विनियोग पारदर्शकपणे होतो की नाही, हे तपासण्यासाठी याच अधिवेशनात कायद्यात सुधारणा केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

महाराष्ट्रातील ४७९ धर्मादाय रुग्णालयांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने अनेक पावले उचलली आहेत. यापूर्वी 'सवलत' या शब्दाची स्पष्ट व्याख्या नसल्याचा फायदा घेत अनेक रुग्णालये कायद्याच्या कचाट्यातून सुटत होती. मात्र, मागील अधिवेशनात कायद्यात सुधारणा करून सवलतीची नवीन व्याख्या निश्चित करण्यात आली आहे. यामुळे आता ही सर्व रुग्णालये धर्मादाय नियमांनुसार खाटा उपलब्ध करून देण्यास कायदेशीररीत्या बांधील आहेत, असे फडणवीस म्हणाले.




रुग्णालयांमध्ये खाटांच्या उपलब्धतेबाबत रुग्णांची दिशाभूल होऊ नये, यासाठी सरकारने विशेष 'डॅशबोर्ड' आणि ऑनलाइन प्रणाली विकसित केली आहे. यामुळे कोणत्या रुग्णालयात किती खाटा रिक्त आहेत, याची माहिती नागरिकांना घरबसल्या मिळत आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, रुग्णालयांना त्यांच्या एकूण निधीपैकी २ टक्के निधी धर्मादाय कामांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. या निधीचा गैरवापर रोखण्यासाठी कायद्यात आणखी कठोर तरतुदी केल्या जाणार आहेत. तसेच, रुग्णालयांना प्रत्येक खाटेचा मूळ दर (बेस रेट) घोषित करणेही आता अनिवार्य करण्यात आले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

विधि आणि न्याय विभागाने २१ एप्रिल २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना', 'आयुष्मान भारत' आणि 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम' लागू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत ४७९ पैकी १३४ रुग्णालये या योजनांशी जोडली गेली आहेत. जे न्यास धर्मादाय रुग्णालय चालवतात, त्यांना सरकारकडून जमीन व अंशदानात सवलत दिली जाते, त्यामुळे निर्धन व दुर्बल घटकांना मोफत उपचार देणे ही त्यांची जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट कालव्यात कोसळली; पती-पत्नीसह तरुण बेपत्ता

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील चांगतपुरी गावाजवळ काल रात्री एक भीषण अपघात झाला. चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट उजव्या कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत कारमधील पती-पत्नीसह त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेला स्थानिक तरुण असे तिघेजण बेपत्ता झाले आहेत. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली असून पोलिसांकडून शोधकार्य सुरू आहे.

कारमधील मुखीद शेख आणि निलोफर मुखीद शेख (रा. कोरडगाव, ता. शेवगाव) हे प्रवासी तर रावसाहेब खडेकर असं बचावकार्यासाठी पाण्यात उतरलेला स्थानिक बेपत्ता तरुणाचं नाव आहे. दरम्यान, या प्रकरणी स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काल सोमवारी रात्री ११ ते ११:३०च्या सुमारास अलताफ पठाण हे आपली स्विफ्ट कार एमएच १२ केजे ९०३२ घेऊन जात होते. कारमध्ये त्यांच्यासोबत मुखीद शेख आणि त्यांच्या पत्नी निलोफर मुखीद शेख हे प्रवास करत होते. चांगतपुरी गावाजवळील कालव्याच्या पुलाजवळ चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्याने कार थेट पाण्यात कोसळली.



कार कालव्यात पडताच चालक अलताफ पठाण यांनी प्रसंगावधान राखत कारबाहेर उडी मारली आणि ते सुखरूप बचावले. मात्र, कार-मधील पती-पत्नी गाडीसह पाण्यात बुडाले. ही घटना समजताच स्थानिक नागरिक मदतीसाठी धावले. यावेळी चांगतपुरी येथील रावसाहेब खडेकर हा तरुण या दाम्पत्याला वाचवण्यासाठी जीवाची पर्वा न करता पाण्यात उतरला. दुर्दैवाने, पाण्याचा प्रवाह जोरात असल्याने रावसाहेब देखील पती-पत्नीसह बेपत्ता झाला आहे. घटनेनंतर सरपंच स्थानिकांनी प्रशासनाला माहिती दिली. रात्री उशिरा जेसीबीच्या साहाय्याने कार कालव्यातून बाहेर काढण्यात आली. मात्र, बेपत्ता झालेल्या तिघांचा शोध लागला नाही. पोलीस आणि स्थानिक नागरिक शोधकार्य राबवत आहेत.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मराठवाड्यातील हवामानात बदल झाला आहे. सोमवारी पहाटे म राठवाड्यातील धाराशिव, लातूर, हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपले. बीडसह अन्य जिल्ह्यांत ढगाळ वातावरण होते. दरम्यान सोमवारी रात्री धाराशिवमध्ये पुन्हा पावसाने हजेरी लावली. लातूर जिल्ह्यात गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले.

सोमवारी सकाळी धाराशिव शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. उमरगा तालुक्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली. त्याचा जनजीवनावर परिणाम दिसून आला.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

मुंबई (प्रतिनिधी) - माहिती व जनसंपर्क महा-संचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, असे कळविण्यात आले आहे.

## पुण्यात स्पा सेंटरवर धाड, भीतीने मॅनेजर आणि महिलेची खिडकीतून उडी, महिलेचा मृत्यू!

मुंबई(प्रतिनिधी)- पुण्यात पोलिसांच्या कारवाई दरम्यान एका महिलेने आणि स्पा मॅनेजरने खिडकीतून उडी मारली. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला आहे, तर मॅनेजर जखमी झाला असल्याची माहिती समोर आली आहे. विमान नगरमधील रूट्स स्पावर पोलिसांच्या पथकाने छापा टाकला. पोलिसांच्या ताब्यातून वाचण्यासाठी महिलेने आणि मॅनेजरने उडी मारली मात्र यामध्ये महिलेचा जीव गेल्याची घटना समोर आली आहे.

पुणे येथील विमाननगर परिसरातील 'द रुट्स स्पा'वर पोलिसांनी (ठरळव`प डरि लशपींशी) छापा टाकताच म हिला कर्मचारी आणि व्यवस्थापकाने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी घडली. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला असून व्यवस्थापक गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, विमाननगर पोलिस स्टेशनच्या पथकाने दुपारी सुमारे तीनच्या सुमारास स्पा सेंटरवर कारवाई केली. अटकेच्या भीतीने महिला आणि व्यवस्थापकाने खिडकीतून उडी मारल्याचे सांगण्यात येत आहे. गंभीर जखमी अवस्थेत महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला. व्यवस्थापकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

कारवाईनंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून स्पा सेंटरचे परवाने, कर्मचारी नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू केली आहे. संबंधित ठिकाणी अनैतिक मानवी व्यापार सुरू असल्याच्या तक्रारी



मिळाल्यानंतर ही छापेमारी करण्यात आली होती. या प्रकरणी व्यवस्थापक आणि मालकाविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.लमृत महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू असून तिच्या मृत्यूची अपघाती मृत्यू अशी नोंद करण्यात येत आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी दिली. घटनेबाबत स्पा सेंटरचे व्यवस्थापन, कर्मचारी आणि इतर संबंधित व्यक्तींची सखोल चौकशी सुरू आहे.

संबंधित 'स्पा'मध्ये देहविक्रीचा बेकायदा व्यवसाय केला जात होता अशी पोलिसांना माहिती मिळाली. या प्रकरणी व्यवस्थापक व मालकाविरोधात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेच्या मृत्यूप्रकरणी अपघाती मृत्यू म्हणून नोंद केली जात आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी दिली.

## राजधानीत संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली (प्रतिनिधी) -समाजप्रबोधनकार, स्वच्छता अभियानाचे प्रणेते व कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणारे संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी कोपर्निकस मार्ग स्थित जुने म हाराष्ट्र सदन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, उपअभियंता किरण चौधरी, आशुतोष द्विवेदी, सहाकय लेखाधिकारी निलेश केदारे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह महाराष्ट्र सदन व परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापक महाराष्ट्र सदन प्रमोद कोलपते यांनी संत गाडगेबाबा महाराज यांच्या समाजप्रबोधन, स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षण प्रसाराच्या कार्याचा परिचय उपस्थितांना करून दिला.


## जाहीर समन्स/नोटीस

बिलोली येथील श्री. व्ही. आय. घोरपडे,
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०१६ पुढील तारीख २३.०३.२०२६

वादी- चंद्रकला भ्र. मलिकार्जुन स्वामी, वय - ५० वर्षे, धंदा-शेती, रा. पाचपिंपळी ता. बिलोली, जि. नांदेड, हा. मु. सिडको नवीन नांदेड.

विरुद्ध

प्रतिवादी- विश्वनाथ पि. इरवंता मठपती व ईतर

प्रति,

प्रतिवादी क्र. १५/ड) प्रेमीला भ्र. परभाअप्पा, रा. घोघारी, ता. भोकर, जि. नांदेड.

ज्याअर्थी आपणांस या जाहीर समन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की, चंद्रकला भ्र. मलिकार्जुन स्वामी, वय ५० वर्षे, धंदा-शेती, रा. पाचपिंपळी ता. बिलोली, जि. नांदेड, हा. मु. सिडको नवीन नांदेड यांनी या न्यायालयाकडे आपल्या विरुद्ध नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०१६ अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदरील दाव्यामध्ये आपण वर दिलेल्याप्रमाणे प्रतिवादी असून, आपल्याला सदरील दाव्यात दिलेल्या पत्यावर बऱ्याच वेळा समन्स व नोटीस पाठविण्यात आल्या, परंतु आपण सदरील समन्स व नोटीस घेण्यास जाणून-बुजून टाळाटाळ करत आहात असे वादीचे म्हणने आहे. तरी या जाहीर समन्स/नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण स्वतः किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर होऊन आपले लेखी जवाब व म्हणने दाखल करावे. जर आपण दिलेल्या वेळेत/तारखेस या न्यायालयात हजर राहण्यास कसूर केल्यास आपले विरुध्द योग्य तो आदेश पारीत करुन प्रकरण एकतर्फा चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

सहा अधिक्षक

## हरवले आहे

माझे प्रल्हाद श्रीराम वडजे रा. असर्जन जयप्रकाश नगर येथील रहिवासी असून, माझा जयप्रकाश कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित फत्तेजंगपूर ता. जि. नांदेड येथे सर्वे नं. १४१, १४२ मध्ये प्लॉट क्र. ३८ आहे. सदरील प्लॉटचे ताबा पत्र व इतर काही कागदपत्र लातूर फाटा ते लोहा प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता-प्रल्हाद श्रीराम वडजे, जयप्रकाश नगर असर्जन नांदेड मो. ९५२९६२१८३१

## Change In Name

My Old Name is CHAUS AFREEN KHALED Now I am Changing as a new NameAFREENFATEEMAMOHAMMAD ZAKEER HUSSAIN Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. ADDRESS -Siddharth Nagar Purna-431511 Mo. 9923301402

## Change In Name

My Old Name is BIDWAIE LAKASHMIKANT KERBA Now I am Changing as a new Name LAXMIKANT KERBAJI BIDWAI Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. ADDRESS -Loha Rajas Bidwai Nagar Loha.

## Change In Name

My Old Name is KERBA BIDWAIE Now I am Changing as a new Name KERBA LAXMANRAO BIDWAI Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. ADDRESS -S/o Laxmanrao Bidwai 1510/13/ABC Loha, Shivkalyan Nagar Loha.

## Change In Name

My Old Name is Abdul Raheman Now I am Changing as a new Name Abdul Raheman Momin Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS -H.NO. 09-05-1039/1 Pakiza Nagar Near Bilal Nagar Tyre Board Nanded-431602 Mo. -9970972626

## Change In Name

My Old Name is SUFIYA BEGUM Now I am Changing as a new Name SUFIYA BEGAM SAYAD YUNUS Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS- 1-21-1106, FARUKH NAGAR TARODA BK. NANDED MAHARASHTRA 431605 MO- 9623840659

## Change In Name

My Old Name is SAYAD YOUNUS Now I am Changing as a new Name SAYAD YUNUS Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS- 1-21-1106, FARUKH NAGAR TARODA BK. NANDED MAHARASHTRA 431605 MO. 9623840659

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




## आजपासून संगीत शंकर दरबारची सांस्कृतिक मेजवानी

**नांदेड (प्रतिनिधी)** – शास्त्रीय गायन, वादन यासह सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असलेल्या संगीत शंकर दरबारची महाराष्ट्रामध्ये एक आगळी-वेगळी ओळख निर्माण झाली असून, उद्या दि. २५ फेब्रुवारीपासून नांदेडकरांना संगीत शंकर दरबारची सांस्कृतिक मेजवानी मिळणार आहे.

संगीत शंकर दरबारचे हे २२ वे वर्ष आहे. यशवंत महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे दि. २५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खा. अशोकराव चव्हाण हे राहणार असून, यावेळी भोकरच्या आ. श्रीजयाताई चव्हाण यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. याच कार्यक्रमात डॉ. राम बोरगावकर यांना जीवनगौरव पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर अनुपमा जोशी यांचे सरोद वादन, रुचिरा केदार व पंडित




रघुनंदन पणशीकर यांच्या शास्त्रीय गायनाचा आस्वाद नांदेडकरांना मिळणार आहे.

गुरुवार, दि. २६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमास माजी आ. सौ. अमिताताई चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होणार असून, यावेळी शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्या अॅड. सुजयाताई चव्हाण यांची उपस्थिती राहणार आहे. त्यानंतर आदित्य मोडक व अनुराधा कुबेर यांचे शास्त्रीय गायन तसेच डॉ. मैसूर मंजुनाथ व मैसूर नागराज यांची व्हायोलीन जुगलबंदी पहावयास मिळणार आहे.

शुक्रवार, दि. २७ रोजी सकाळी ६ वाजता कुसुम सभागृहात मंगेश बोरगावकर व संच यांचा माय मराठी, सूर मराठी या कार्यक्रमाचे मराठी दिनानिमित्त आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या संगीत शंकर दरबार सोहळ्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी. पी. सावंत, सह सचिव डॉ. रावसाहेब शेंदारकर व कोषाध्यक्ष अॅड. उदय निंबाळकर यांनी केले आहे.

## रातोळीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मध्यरात्री धाडसी चोरी; १८ तोळे चांदीचे मुकुट व रोकड लंपास

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव तालुक्यातील रातोळी गावातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना घडली आहे. पहाटे उघडकीस आलेल्या या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून, पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

मंदिरातील देवाच्या चांदीच्या दागिन्यांमध्ये तब्बल ६५ तोळ्यांचा एक मुकुट, ३३ तोळ्यांचा दुसरा मुकुट, सुमारे ३ ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच कपाटात ठेवलेली अंदाजे ३० हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली. एकूण लाखोंचा ऐवज चोरीस गेल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे.

मंगळवारी सकाळी मंदिर उघडताच चोरीचा प्रकार उघडकीस आला. कपाट फोडलेले आणि देवाच्या मूर्तीवरील दागिने गायब झाल्याचे पाहून पुजारी व ग्रामस्थ स्तब्ध झाले. काही क्षणांतच ही वार्ता गावभर पसरली आणि मंदिर परिसरात नागरिकांची गर्दी उसळली.

घटनेची माहिती मिळताच नायगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तपासासाठी श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. श्वान 'कोको'ला कपाटाची चावी व ड्रॉवरचा वास देण्यात आला. त्यानंतर तिने मंदिर परिसरातून सुगावा घेत पूर्वेकडे सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत माहेगाव-कार्ला रोडपर्यंत धाव घेतली. तेथे ती गोल फिरत सतत भुंकू लागली.

या हालचालीवरून चोरटे त्या ठिकाणी वाहनाच्या सहाय्याने पसार झाले असावेत, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी तसेच संशयितांवर लक्ष ठेवण्याचे काम सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तपास कार्यात श्वान पथक प्रमुख महमद आयुब, पोहेकॉ. दत्ता गायकवाड तसेच बीट जमादार बालाजी शिंदे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. विशेष म्हणजे, मंदिरात प्रवेश करताच श्वान 'कोको' हिने भगवान विठ्ठल-रुक्मिणी यांना नमस्कार करून अभिवादन केल्याचे दृश्य पाहून उपस्थित ग्रामस्थांनी कौतुकाची दाद दिली.

## शिवजन्मोत्सवानिमित्त तुप्पा येथे आयोजित शिबिरात ६५ जणांनी केले रक्तदान

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –शिवजन्मोत्सवा-निमित्त नांदेड तालुक्यातील तुप्पा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जीवन आधार रक्तपेढीने रक्तसंकलन केले. यावेळी गावातून सिंहासनावर विराजमान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची मिरवणूक ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतीषबाजीमध्ये काढण्यात आली. यावेळी विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले.

शिवजन्मोत्सव निमित्ताने प्रारंभी गावातील अश्वारूढ पुतळ्याचे विधीवत पूजन करण्यात आले. या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनावर विराजमान असलेल्या पुतळ्याची मिरवणूक ट्रॅक्टरमधून काढण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे विधीवत पूजन प्रतिष्ठित नागरिक माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाटील कदम, सरपंच यन्नावार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जीवन आधार रक्तपेढीच्यावतीने रक्त संकलन करण्यात आले. यावेळी ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. जयंती मंडळ अध्यक्ष प्रताप कदम, उपाध्यक्ष शुभम कदम, सचिव प्रशांत पवार, किशोर कदम, वैभव पवार, बापूजी कदम, तेजस कदम, ज्ञानेश्वर कलंबरे, ओंकार कदम, आकाश कदम, अमोल कदम, दीपक कोरके, कृष्णा कोरके, वैभव पवार, ऋषीकेश शिंदे, गणेश देशमुख, अनिल गुद्दे यांच्यासह समिती पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले व पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील नरवाडे यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

## एसजीजीएसच्या साक्षीला ६१ लाखांचे पॅकेज

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्थेतील अभियांत्रिकी (बी. टेक) शाखेची विद्यार्थिनी साक्षी तेजराम ठाकरे हिची नेदरलँडमधील स्कीप्सवर्फ या आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. तिला वार्षिक ६१ लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे.

एसजीजीएसमध्ये नुकत्याच कॅम्पस मुलाखती झाल्या. या कॅम्पसमध्ये या संस्थेतून मेकॅनिकल विभागाची ही पहिली आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट आहे. साक्षी तेजराम ठाकरे हिचे प्राथमिक शिक्षण एस. टी. जोसेफ हायस्कूल, नागपूर येथे झाले असून, तिने अभियांत्रिकी शिक्षणासाठी श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी, नांदेड ची निवड केली. ती बी. टेक. अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिकत आहे.



संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, विभागप्रमुख डॉ. एस. जोगी आणि डॉ. ए. मिश्रा, प्रा. तिलक जाधव, प्रा. डॉ. जीत पाटील, जे. एस. सारडा यांचे साक्षीला मार्गदर्शन लाभले.

## काँग्रेसच्या विरोधात भाजपचे आंदोलन, महिलांचा सहभाग




**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्लोबल एआयच्या विरोधात काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी केलेल्या कृत्याचा भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने महात्मा फुले चौक आयटीआय येथे मंगळवार दि. २४ फेब्रुवारी रोजी निषेध करण्यात आला.

याप्रसंगी भाजपा महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजूरकर, भाजपा महानगर अध्यक्षा तथा नगरसेविका ज्योती किशन कल्याणकर, भाजपा महिला दक्षिण जिल्हाध्यक्षा अनिता चौंडीकर, महापौर कविता संतोष मुळे, दिलीप कंदकुर्ते, प्रवीण साले, विजय येवनकर, महानगर उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे, माजी सरपंच बंडू पावडे, लक्ष्मीकांत गोणे, भाजपा महिला मोर्चा मंगाराणी अंबुलगेकर, मंगला निमकर, मंगला धुळेकर, अनिता इंगोले, महादेवी मठपती, अनुजा तेहरा, सुषमा थोरात, अपर्णा चितळे, डॉ. शितल भालके, डॉ. सान्वी जेठवाणी, नगरसेविका सुवर्णा बस्वदे, रुची भारतीया, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष शशिकांत क्षिरसागर, नगरसेवक सुमीत मुथा, नगरसेवक दयानंद वाघमारे, भालचंद्र पवळे, बजरंगसिसंह ठाकूर, नगरसेवक अभिषेक सौदे, संतोष मानधने, शितल खांडील, दिलीप ठाकूर, सुरेश लोट, अॅड. प्रसाद रानवळकर, विश्वास गुंडावार, रमेश पाटील कोकाटे, श्रीराम पाटील कोकाटे, राज यादव, शिवा लोट, अमित वाघ यांच्यासह आदी उपस्थित होते.

## जीवन अल्लापुरे यांचे निधन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – देगलूर तालुक्यातील आलापूर येथील रहिवासी जीवन मोहनराव अल्लापुरे यांचे सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता अल्लापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अंत्यविधीस गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई-वडील, भाऊ-बहीण असा मोठा परिवार आहे. ते नरसी येथील स्वरांश पॅथॉलॉजीचे मालक गजानन गायकवाड यांचे भाऊजी होत.






## मुख्याध्यापक सुधाकर पोवळे यांना तुरुंगवास

**नांदेड (प्रतिनिधी)** – महात्मा फुले प्राथमिक विद्यालय, पकंज नगर, धनेगाव ता.जि. नांदेडचे मुख्याध्यापक सुधाकर निवृत्ती पोवळे यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी करून त्यांना अटक करण्यात आली आहे. शाळा न्यायाधीकरण लातूर यांच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांना तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

शाळा न्यायाधीकरण लातूर येथे दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी बेलीफामार्फत हजर करण्यात आले असता त्यांनी शाळा न्यायाधीकरण लातूर यांच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे व शाळा न्यायाधीकरणात सिव्हील प्रिजनची व्यवस्था नसल्यामुळे त्यांना दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजीपर्यंत न्यायलयीन कोठडी देण्यात आली व त्यांची रवानगी चार दिवसांकरिता जिल्हा कारागृह नांदगाव आर्वी रोड लातूर ता.जि. लातूर येथे करण्यात आली होती.

लातूर येथील शाळा न्यायाधीकरण या न्यायाधीकरणात जळबा लक्ष्मण कानगुलवार व विजयकुमार अंबाजी दवणे यांनी सेवेत पूर्ववत रुजू करून घेऊन थकीत वेतन मिळणेबाबत अंमलबजावणी अर्ज क्र. ३२/२०२४ व ३३/२०२४ अनुक्रमे दाखल केले आहे.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.


फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com